३०२६



BVBK-0403026

# रत्नहा

मो. मा. वा

आ.वा.
३०२६
१२।१२।९४

# लाख मोलाचा रत्नहार

३०२६ दिनांक १२।१२।९४
आ.वा.

मोरेश्वर माधव वाळिंबे

BVBK-0403026

श्री समर्थ साई वितरण

प्रकाशन क्र. ७.

: प्रकाशक :
श्री. सुनील अंबिके
**श्री समर्थ साई वितरण**
१५६, मंगळवार पेठ,
पुणे ४११०११.

: सर्वहक्क :
श्री. मो. मा. वाळिंबे
नर्मदा', ८०६ बी, शिवाजीनगर,
पुणे ४११००४.

: मुखपृष्ठ :
श्री. दत्ता वैद्य, पुणे.

: प्रथमावृत्ती :
ऑगस्ट, १९९४

: मुद्रक :
श्री. सुनील अंबिके
**श्री समर्थ साई मुद्रण**
४२६, सोमवार पेठ,
बरके आळी, पुणे ४११००१.

: मूल्य :
रुपये अठरा फक्त.

# अनुक्रम


१. लाख मोलाचा रत्नहार ५

२. रजुली आणि मालुसाही २४

३. धूला कुट्टया ३९

४. वाघ आणि माणूस ४९

३०२६ दिनां. १२/१२/१८
विषय

# 1.

# लाख मोलाचा रत्नहार

गंगा नदीच्या तीरावर कांपिल्य नावाचे सुरेख, टुमदार नगर वसले होते. या नगरात चक्रेश्वर राजा राज्य करीत होता. त्याचे आपल्या प्रजाजनांवर नितान्त प्रेम होते. एक न्यायी, नितिमान अन् धर्मपरायण राजा, असा त्याचा चहुदिशी लौकीक होता. चोरीचहाडी, लाचलुचपत, खून, मारामारी, बलात्कार, अपहार यांसारख्या गुन्ह्यांना त्याच्या राज्यात कडक शासन असे.

चक्रेश्वराच्या दरबारी अर्जुनदेव नावाचा प्रधानमंत्री होता. राजाच्या खालोखाल पण राजा एवढीच त्यालाही सर्वत्र मानमान्यता होती. राजाप्रमाणेच अर्जुनदेवही कर्तव्यतत्पर अन् सद्‌गुणपरायण होता.

अर्जुनदेवाचा ज्येष्ठ पुत्र परशुराम हा एक श्रेष्ठ पंडित आणि विद्वान शास्त्री म्हणून नावाजलेला होता. नाना शास्त्रांत त्याला गती होती. काव्य, व्याकरण, भाषा, गणित, ज्योतिष, संगीत, इत्यादी वेगवेगळ्या विद्यांत त्याने आपल्या बुद्धीची चमक अशा प्रकारे दाखवली होती की, त्या त्या विद्यांचे अन् कलांचे जाणकार, जिज्ञासू, पृच्छक आपापल्या समस्या घेऊन परशुरामाकडे येत अन् तोही दिवसेंदिवस त्यांच्या समस्या सोडविण्यात आणि त्यांच्याशी वादविवाद करण्यात दंग होऊन राही. तो नोकरीचाकरी काही करीत नसे. दिवसरात्र चालू असणाऱ्या विद्वच्चर्चेतूनही त्याला मोठीशी धनप्राप्ती होत नव्हती. पैसे मिळवण्याची कल्पनाच त्याला मान्य नव्हती. शिवाय, विद्वत्तेवर पैसा संपादन करायला तर त्याचा

सक्त विरोध होता. तात्पर्य, त्याचे जीवन हे आपले 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' असेच चालले होते.

तसे ते चालायलाही कोणाची हरकत नव्हती; पण शेवटी व्यवहार म्हणून काही असतोच की! परशुराम हा विद्वान होता, बुद्धिमान होता, पंडितप्रवर होता, सगळे खरे; परंतु अखेर तो गृहस्थ होता. त्याच्या पदरी पत्नी अन् चार मुलेबाळे यांचा खटला होता. रोजच्या अडिअडचणी अन् नैमित्तीक दुखणीभाणी यातून तोही सुटला नव्हता, सुटणारही नव्हता. प्रपंच म्हटला की पावलोपावली पैसा फेकावा लागतो. अशा स्थितीत घरातल्या कर्त्या पुरुषाने असा नुंसत्याच विद्वद्गोष्टी करीत राहण्याचा वसा घेतला तर काय म्हणणार?

अर्जुनदेवाला परशुरामाच्या या घरबशावृत्तीची मनस्वी चीड येई; पण तो बोलत नसे. त्याला वाटे, आज नाही उद्या लेकाला शहाणपणा सुचेल आणि तो धनार्जन करू लागेल. पण व्यर्थ! अर्जुनदेवाचे 'वाटणे' त्याच्याजवळच राहिले. चिरंजीव परशुरामपंत दिवसेंदिवस संसाराविषयी जास्त जास्तच उदासीन राहू लागले.

एके दिवशी तर हद्दच झाली! काय झाले?

राजाने स्वत:स.ठी एक बहुमोल रत्नजडीत हार सुवर्णकाराकडे करायला दिला होता. हार तयार झाला अन् सुवर्णकाराकडून तो घेऊन जाण्याविषयी प्रधानजींना निरोप आला. प्रधानजी अर्जुनदेवांनी तो आणला आणि परशुरामाच्या हाती देऊन म्हटले,

"मी जरा घाईत आहे. दरबारचं दुसरं एक महत्त्वाचं काम अकल्पितपणे निघालं, ते करून येतो, तोवर हा हार सांभाळा. हार बहुमोल आहे. नीट ठेवा. मी आलो की परत द्या."

परशुरामाने बरे म्हटले. हार घेतला अन् बसल्या जागी उजव्या हाताशी ठेवून दिला. पुन्हा समोरच्या विषयात डोके खुपसले. मुद्दे अन् प्रमाणे यांची अटीतटीने मांडणी सुरू झाली. अर्जुनदेव गडबडीत होते. ते लगबगीने कामाला निघून गेले. परशुराम कामात गर्क होताच. समोर बसलेल्या सर्व माणसांचे लक्ष्य परशुरामाच्या बोलण्याकडे होते.

घरातला एक सेवक कालिप्रसाद जवळच उभा होता. हाराचा सगळा प्रसंग त्याच्या नजरेसमोर घडला होता. अचानक त्याच्या मनी पाप उपजले. जन्मभर नोकरी करून मिळणार नाही, एवढे द्रव्य हा हार हडप केल्यामुळे काही क्षणांत मिळेल, असे त्याला वाटले. त्याने बराच वेळ इकडे तिकडे केले अन् मग अलगद परशुरामाच्या उजव्या हाताजवळचा हार उचलला; अंगावरच्या लांब चोग्याच्या आतल्या चोरकप्प्यात बेताने ठेवून दिला. कोणी पाहिले नाही. परशुरामाच्या तर काहीसुद्धा लक्षात आले नाही. तरीपण उगाच शंका नको, म्हणून कालिप्रसाद राजरोस पुढे आला आणि त्याने सहज विचारावे तसे विचारावे,

"धनी, दूध गरम करून आणायला हवं ना?"

परशुराम आपल्याच तंद्रीत होता. त्याने वर न बघताच 'हो' म्हटले. कालिप्रसादाने ही संधी घेतली. तो लगोलग पाकशाळेकडे गेला. तिथल्या एका सेवकाला जरा दमात घेत म्हणाला,

"काय रे, धाकट्या धन्यांचं दूध नेऊन द्यायला केवढा उशीर केलास? आता तरी लवकर घेऊन जा. अन् तापवून ने ते, नाहीतर तापतील बघ ते."

असे म्हणून मिस्किलपणे हसत तो तिथून नाहिसा झाला.

घटकाभराने पाकशाळेतल्या सेवकाने गरम, मसालेदार दुधाचा पेला परशुरामापुढे आणून ठेवला. एक भला मोठा ग्रंथ हाती घेऊन त्यावरील ओळींवर नजर फिरवता फिरवता त्याने जवळचा दुधाचा पेला उचलला अन् एकाच घोटात रिता करून खाली ठेवला. पुन्हा तो आपल्या कामात दंग होऊन गेला.

असे होता होता दिवेलागण झाली. अर्जुनदेव आपल्या कामाहून घरी परतला. पगडी - उपरणे उतरवून ठेवताना त्याचे लक्ष परशुरामाकडे गेले, तर अजूनही तो बसल्या जागीच वादविवादात रंगून गेलेला. अर्जुनदेवाला त्याला पाहून एकदम संताप आला. त्याच वेळी त्याला, आपण राजाचा रत्नहार परशुरामाकडे ठेवायला दिल्याची आठवण झाली. कसाबसा संताप आवरून त्याने परशुरामाला म्हटले,

"अरे परशुराम, दुपारी तुझ्याकडे मी महाराजांचा रत्नहार

ठेवायला दिला होता, तो दे पाहू.''

परशुराम आपल्या तंद्रीतच होता. वडिलांनी आपल्याजवळ कसलासा हार ठेवायला दिला होता, एवढे त्याला आठवत होते. तो हार आपण इथेच कुठेतरी जवळ ठेवला, हेही अंधुकसे आठवत होते. म्हणून वडिलांनी हार मागताच तो प्रथम थोडा गडबडला अन् मग उठून तिथल्या तिथेच खालीवर, अलीकडे, पलीकडे शोधू लागला, पण काही केल्या हार सापडेना. हार तिथे राहिलाच नव्हता, तर मिळणार कुठून? अचानक परशुरामाच्या हाताला बैठकीच्या खाली काहीतरी लागले. वडिलांनी दिलेला हारच तो असणार याविषयी त्याला तिळमात्र शंकाच उरली नाही. त्याने पटकन् बैठकीखाली हात घालून ती वस्तू काढली आणि काही न बघताच हर्षभराने वडिलांकडे फेकत तो म्हणाला,

''हा घ्या हार. सापडला! जातो कुठे?'' एवढे बोलून त्याने पुन्हा एक जाडजूड ग्रंथ उचलला आणि तो वाचण्यात तो हरवून गेला.

परशुरामाने फेकलेली वस्तू अलगद हातात झेलून अर्जुनदेवांनी पाहिली मात्र; आणि सारे घर दणाणून टाकील अशा दणदणीत आवाजात ते परशुरामावर कडाडले,

''परशा, शुद्धीवर आहेस का तू? हा काय रत्नहार आहे होय? जरा शुद्धीवर येऊन, नि डोळे उघडून बघ तुझी जपाची स्फटिकमाळ आहे ही. कुठं ठेवलास तो रत्नहार? ऊठ जरा. गुंडाळून ठेव त्या पोथ्या अन् आवर तो विद्वत्तेचा बाजार. काय विद्रकल्याणी पोरटा आहे. गेला, गेला तो लाख मोलाचा हार! आता राजेसाहेब काय म्हणतील मला? सगळं आयुष्य प्रामाणिकपणे सेवा करण्यात गेलं अन् म्हातारपणी, आयुष्याच्या अखेरीला या दिवट्याच्या करणीमुळे हा नसता ठपका येणार कपाळी.''

कधी नव्हे ते अर्जुनदेव रागावले होते. एरवी अत्यंत संयमी अन् शांत म्हणून त्यांचा लौकीक होता. पण झालेल्या नुकसानीमुळे आज त्यांचा तोलच गेला होता. त्यांच्या बोलण्याला धार होती. चीड आणि उपहास त्यात काठोकाठ भरला होता. परशुरामाला

ते बोलणे असह्य झाले. तो .तिरीमिरीने उठला आणि खांद्यावरची शाल उलगडून अंगभर पांघरून घेत, वडिलांच्या डोळ्याला डोळा देऊन बोलला,

"बाबा, ऐकलं तुमचं सगळं बोलणं. खूप बोललात. आता पुरे! माझ्या हातून बहुमोल जिन्नस हरवला हे तर खरंच; पण तो मी स्वत: द्रव्य खर्चून आणून देईन. तोपर्यंत विश्रांती घेणार नाही. या घरात राहणारही नाही."

असे म्हणून परशुराम ताडताड पावले टाकत तिथून बाहेर पडला. बाहेरच्या काळोखात नाहिसा झाला. सगळा प्रकार काही क्षणात घडला. अर्जुनदेव भानावर आले तेव्हा त्यांना आपण परशुरामाला एवढे टाकून बोलायला नको होते, असे वाटले. पण आता या पश्चात्तापाचा उपयोग नव्हता. बाण भात्याहून केव्हाच सुटला होता. आता तो माघारी येणे शक्य नव्हते.

परशुराम तिथून निघाला तो ध्यानीमनी काही नसताना सरळ उत्तर दिशेला चालत राहिला. रस्ता संपला तेव्हा तो थांबला. त्या वेळी मध्यरात्र उलटली होती. उत्तररात्रीचे थंडगार वारेही वाहत होते. आकाशात चांदण्या एकमेकींकडे डोळे मिचकावीत पाहत होत्या. आणि अशा अपरात्री अंगाभोवतीची शाल आणखी लपेटून घेऊन परशुराम एका राजरस्त्यावर स्तब्ध उभा होता. तो उभा होता, ते इंद्रप्रस्थ नगर होते. परशुराम तिथे बराच वेळ उभा होता; पण असा किती वेळ उभा राहणार? शिवाय, त्याचे पाय आता मनस्वी दुखू लागले. सारे शरीरही ताठून गेले होते. त्यामुळे थकल्या भागल्या शरीराला विश्रांती द्यावी, या हेतूने त्याने जवळच्याच सार्वजनिक उद्यानाकडे पावले वळवली. उद्यानात प्रवेश करताच त्याला खूप बरे वाटले. एखादे प्रशस्त झाड पाहून त्याच्या खोडाला टेकावे म्हणून तो चालू लागला, तो समोरच त्याला एक तळे दिसले. त्या तळ्याचे पाणी शांत होते. त्या पाण्यात वरच्या चंदेरी आकाशाचे प्रतिबिंब पडले होते. तळ्याकाठच्या एका कुंजात रातराणी बहरली होती. ते संथ, चंदेरी पाणी, ती धुंद रातराणी अन् भोवतालचा रम्य आसमंत पाहून परशुरामाचा थकवा

कुठच्याकुठे पळून गेला. तो अगदी ताजातवाना झाला. तळ्याकाठी बसून त्याने भराभरा त्या थंडगार पाण्याचे हबके तोंडावर मारले. हातपाय धुतले. मग त्याला खूप हलके, खूप प्रसन्न वाटले. तो एक लकेर घेतच तिथून उठला अन् जवळच्याच एका विशाल वटवृक्षाच्या बुंध्याजवळ जाऊन आरामात बसला. वातावरणात दरवळणारा रातराणीचा गंध छातीत भरून घेत, माथ्यावरच्या रत्नखचित आकाशाकडे बघू लागला.

एवढ्यात जयदेव नावाचा एक श्रीमंत व्यापारी फिरत फिरत तिथे आला. त्याला कसलासा आजार झाला होता अन् त्यावर उपचार म्हणून उत्तररात्री उद्यानविहार करायला वैद्याने सांगितले होते. जयदेव तिथे रोजच येत असे. आज तो तिथे आला आणि सहजच त्याचे लक्ष झाडाखाली आरामात बसलेल्या परशुरामाकडे गेले. त्याने 'कोण, कुठले' अशी परशुरामाची चौकशी केली. आपला खराखुरा परिचय देणे अन् अशा अपरात्री आपण इथे का येऊन बसलो, हे सांगणे, परशुरामाला अवघड तर वाटले, शिवाय अपमानकारकही वाटले. तो फक्त हसला आणि 'थंडी काय पडलीय नाही?' असे अर्धवट आपल्याशी नि अर्धवट जयदेवश्रेष्ठींशी बोलत जागचा उठला. आपण या माणसाला 'कोण, कुठले' विचारले, ते त्याला आवडले नाही, हे जयदेवश्रेष्ठींच्या तेव्हाच लक्षात आले; परंतु त्याच्या कपड्यांवरून, बोलण्या - चालण्याच्या धाटणीवरून तो कुणीतरी विद्वान पंडित असावा, हेही त्याला समजले. त्याने मग अधिक चौकशी केली नाही. मात्र परशुरामाला तो पुन्हा म्हणाला,

"हे पाहा, तुम्ही कुणीही असा. एक गोष्ट खरी की तुम्ही एवढ्या अपरात्री ज्या अर्थी एकटेच या उद्यानात आला. त्या अर्थी तुम्ही परगावचे आहा अन् थोडेफार संत्रस्तही आहात. आता मी विचारू नये, पण तुमच्या संत्रस्ततेचं कारण मला जर कळलं तर, मला वाटतं, मी आपली चिंता थोडीफार तरी कमी करू शकेन!"

जयदेवश्रेष्ठींचे हे अत्यंत प्रेमळ, आत्मियतेचे भाषण ऐकून

परशुरामाला खूप बरे वाटले. तो काहीशा गंभीरपणेच बोलला,

"तुमचं म्हणणं खरं आहे. मी इथला नाहीच, थोडाफार त्रासलेलोदेखील आहे; पण तुमच्यासारख्या सज्जनाला अगदी प्रथमभेटीतच आपल्या चिंता ऐकवून त्रास द्यावा, असं मला काही केल्या वाटत नाही. तुम्ही मला आपला नाव-पत्ता सांगितला तर मी उद्यापरवा तुम्हाला येऊन भेटेन हवं तर!"

"तसं कशाला? तुम्ही माझं ऐका. तुम्ही आताच माझ्या घरी चला. माझं नाव जयदेवश्रेष्ठी. इथं माझी व्यापार पेढी आहे. आपण मुळीच संकोच करू नका. दोन-चार दिवस निवांत राहा. खा, प्या. विश्रांती घ्या. त्रासलेले आहात ते थोडे शांत व्हा. ऐका माझं...."

जयदेवश्रेष्ठींची एवढी आग्रहाची विनंती मोडणे, परशुरामाच्या अगदी जिवावर आले. त्याने थोडा वेळ विचार केला अन् कबुली दिली.

"ठिक आहे. चला."

दोघेही बोलत बोलत घरी परतले.

जयदेवश्रेष्ठींचे घर चांगले ऐसपैस होते. घराभोवती फळा - फुलांनी लहडलेल्या वृक्षवेली होत्या. मागीलदारच्या गोठ्यात गाई - म्हशींचे खिल्लार होते. मुलाबाळांनी, लेकीसुनांनी गजबजलेले ते कुटुंब पाहून परशुरामाला प्रसन्न प्रसन्न वाटले. जयदेवश्रेष्ठीने तर घरात त्याची राजासारखी बडदास्त ठेवलीच, पण घरातल्या बाकीच्या बायका - पुरुषांनी आणि मुला - मुलींनीही त्याला अत्यंत सन्मानाने वागवले. चार दिवसांतच परशुराम त्या घरात, घरच्यासारखा होऊन गेला.

एक दिवस दुपारच्या वेळी जयदेवश्रेष्ठी आपल्या पेढीवर बसला होता. जवळच परशुरामही कसलेसे पुस्तक चाळत होता. एवढ्यात पेढीवर एक अमौलिक जिन्नस ठेवीत म्हणाला,

"शेठजी, याची किंमत काय होईल सांगा बघू!"

जयदेवश्रेष्ठींने तो जिन्नस हाती घेतला मात्र; सहस्त्रावधी रत्नांचा एकदम लखलखाट झाला. त्या प्रकाशशलाका शेठजींच्या

आणि परशुरामाच्या मुखमंडळावर झळकून गेल्या. तो एक लाखो रुपये किंमतीचा रत्नहार होता. शेठजी तो फिरवून फिरवून निरखून पाहत होते. स्वत:शीच त्याचे मोल करीत होते. अकस्मात त्यांनी तो हार परशुरामाकडे टाकला अन् ते म्हणाले,

"पाहा, पाहा, पंत, किंमती रत्नहार म्हणजे काय चीज असते ती. अहो, नुसती बघायलादेखील साता जन्मींचं भाग्य लागतं. तुमचं ते आहे. म्हणूनच म्हणतो, जरा निरखून फिरवून पाहा."

शेठजींनी टाकलेला रत्नहार हातात येताच कसलेसे स्मरण होऊन परशुराम चमकला. त्याने पटकन् वर मान उंचावून पेढीवर आलेल्या इसमाकडे पाहिले आणि तो भान न राहवून एकदम म्हणाला,

"अरे कालिप्रसाद, तू इकडं कुणीकडं? अन् हा हार तुझ्याकडं कसा आला? वर ये, वर ये, काय प्रकार आहे. बोल तर खरा."

परशुराम एवढं विचारतोय तो दारातला इसम काहीसा गडबडला. पण तसे न दाखवता तो बेफिकीरपणे जागच्या जागीच उभा राहिला. काय प्रकार आहे शेठजींना समजेना. त्यांनी कपाळाला आठी घालून म्हटले,

"कालिप्रसाद? हा कोण कालिप्रसाद?"

"हाच की, हा नोकर आमचा."

"तुमचा?"

"हो. आमचाच."

"अन् हा हार?"

"हार...." परशुराम बोलत असतानाच त्याचे बोलणे मध्ये तोडून, गडबडीने तो दारातला माणूस बोलला.

"थांबा, थांबा. मी सांगतो. हा हार राजाचाच आहे पण त्याला तो विकायचा आहे. मी त्याचा दिवाणजी, म्हणून त्यानं हे काम मजवर सोपवलं" असे म्हणून त्या माणसाने आपली पगडी ठाकठीक केली. उपरणे सारखे केले अन् तो मिशीवर

हात फिरवीत दिमाखाने उभा राहिला.

"तरी मी म्हटलंच. पाहिल्याबरोबर मी ओळखलं की, एवढा किमती हार राजघराण्यातलाच असला पाहिजे. बरं, मी असं विचारतो, की हा तुमचा राजा कुठं राज्य करतो?" जयदेवश्रेष्ठींनी मुद्दामच म्हटले. त्यांनाही थोडी शंका आलीच होती. पण ते मुरब्बी व्यापारी होते. एकदम एखाद्यावर अविश्वास व्यक्त करणं, त्याच्यावर संशय घेणे किंवा त्याला गुन्हेगार ठरवणं त्यांच्या स्वभावात बसत नव्हतं. परशुराम रागाने लालबुंद झालेला पाहून अन् तो बोलण्यासाठी सारखी चुळबुळ करतो आहे असं बघून, जयदेवश्रेष्ठींनी त्याला जरा शांत केले आणि थोडे सबूरीने घेण्याचा सल्ला दिला. फिरून त्याने त्या माणसाला विचारले,

"काय म्हटलंत तुमच्या राजाचं नाव?"

"रोहण नगरचा राजा. मी त्यांचा दिवाणजी, माझं नाव गंगभट्ट." तो माणूस ताठ्यात बोलला.

"ठीक. मला आता असं सांगा, तुमच्या राजानं या हाराची किंमत किती येईल, असं सांगितलंय? अधिक स्पष्ट विचारतो, हा हार त्यांना केवढ्यापर्यंत विकायचाय?"

तो माणूस क्षणभर गप्प उभा राहिला. हा प्रश्न त्याला अडचणीचा वाटला. तरीपण तो एकदम गडबडीने म्हणाला.

"निदान याचे लाखभर रुपये यायलाच हवे."

त्या माणसाने ते वाक्य ऐकताच जयदेवश्रेष्ठींनी एकाएकी रुद्रावतार धारण केला अन् ते गरजले.

"मूर्खा, यातलं एकेक रत्न लाख लाख रुपये किंमतीचं असताना, तू सगळ्या हाराचे लाख रुपये मागतोस. खात्रीनं तू हार चोरून आणला आहेस. आता मी या सर्व प्रकरणाची खडान्खडा माहिती काढल्याशिवाय हा हार परत करीत नाही."

प्रकरण अंगलट येतंय नि तो अमोल रत्नहारही हातून निसटतोय असं बघितल्यावर त्या माणसाचा धीर सुटला आणि तो एकदम एकेरीवर येऊन आकांडतांडव करू लागला.

"हा म्हणजे शुद्ध अन्याय आहे. मी शपथपूर्वक सांगतो,

मी चोर नाही. परद्रव्य मी नेहमीच विषासारखं मानलं आहे. राजेसाहेबांनीच सांगितलं म्हणून मी हे काम पत्करलं. तुम्हाला जर तो हार घ्यायचा नसेल तर माझा मला परत द्या.''

त्यावर जयदेवश्रेष्ठी म्हणाले,

''मूर्ख माणसा, तुझ्या हे लक्षात यायला हवं होतं, कोणताही राजा आपल्या जामदारखान्यातली वस्तू अशी कोणाच्या हाती देऊन सराफबाजारात विकायला पाठवीत नसतो. खरं म्हणजे कोणत्याही राजाला असला अनमोल हार विकायची गरज कधी पडत नाही. तू हार चोरला आहेस आणि तो विकू बघत होतास. खरं की नाही ?''

तरीही तो माणूस एकच गोष्ट पुन्हापुन्हा सांगत राहिला. ''मी चोर नाही. माझा हार परत करा.''

जयदेवश्रेष्ठींनी मात्र त्याचे काही ऐकले नाही. त्यांनी तो रत्नहार परशुरामाजवळ दिला आणि त्याला म्हटले,

''पंत, हा हार तिजोरीत बंदोबस्ताने ठेवून द्या.''

परशुरामाने हार उचलला नि तिजोरीत नेऊन ठेवला.

हार तिजोरीत बंदिस्त झालेला पाहताच तो माणूस ''मला लुटलं, मला नागवलं'' असे ओरडत राजाकडे गेला.

तो गेल्यावर परशुरामाने त्या हाराचा आरंभापासूनचा सर्व वृत्तान्त जयदेवश्रेष्ठींना निवेदन केला आणि वर म्हटले,

''हा निस्संशय कालिप्रसादच आहे.''

जयदेवश्रेष्ठी म्हणाले,

''ठीक आहे. आता तो ओरडत गेला राजाकडेच. राजा योग्य तो निवाडा करीलच.''

एवढे बोलणे होत आहे तोच राजाचा दूत दारी आला. म्हणाला,

''जयदेवश्रेष्ठी तुम्हाला नि तुमचे हे कोण पाहुणे आहेत त्यांना राजेसाहेबांनी बोलावलंय.''

''हां आलोच,'' असे बोलून श्रेष्ठी व परशुराम दोघे राजवाड्याकडे निघाले.

राजवाड्यात पोहचतात त्यांनी राजाला सर्व प्रकार कथन केला. राजाने शांतपणे विचारले.

"तो हार कुठं आहे, पाहू."

"हा घ्या." जयदेवश्रेष्ठींनी दूरदृष्टीने बरोबर आणलेला हार पुढे टाकला. तो रत्नहार पाहताच अगणित संपत्तीचा मालक असलेल्या त्या धनाढ्य राजाच्या डोळ्यांनाही टक लागले. त्यालाही त्या अनमोल हाराचा लोभ वाटला. त्याने त्या माणसाकडे वळून म्हटले,

"हा हार तुझ्या मालकीचा आहे ना. मग तू दिव्य करून त्याच्यावरची मालकी सिद्ध कर."

"कोणतं दिव्य करू?" त्याने विचारले.

"आमच्या प्रासादाच्यामागे एक जलकुंड आहे. त्यात कमळं फुलली आहेत. हे जलकुंड दिसायला उथळ दिसतं; पण तसं ते नाही. चांगलं पन्नास-साठ फूट खोल आहे. त्याचा तळ दिसतो. जो गुन्हेगार नाही तो या तळ्यात बुडत नाही. तू तळ्यात उतरून देवीच्या पूजेसाठी कमळ काढून आण."

"अवश्य आणीन; पण हे दिव्य मीच एकट्यानं काय म्हणून करायचं? या दोघांनीही हेच दिव्य केलं पाहिजे!"

"कबूल. तू आधी उतर."

त्याने ते मान्य केले. तो भीतभीत तळ्यात उतरला. त्याची कल्पना, आपण पोहत जाऊन लीलया कमळपुष्प तोडून आणू; पण ते त्याला साधले नाही. त्याने पाण्यात पाय टाकला मात्र; तत्काळ तो खाली बुडाला. पार तळाशी गेला.

त्या माणसाला असा मृत्यू आल्यावर राजाने परशुरामाकडे वळून म्हटले,

"आता तुमची पाळी. तुम्ही तळ्यात उतरा."

त्यावर परशुराम ठामपणे म्हणाला,

"मी तळ्यात उतरणार नाही. तशी आवश्यकता नाही. तुमच्याच म्हणण्याप्रमाणे जो गुन्हेगार होता तो बुडून तळाशी गेला. आता हा हार त्याचा नव्हता हे सिद्ध झालंय. मग हार कोणाचा, हे कोडं वाटेल पण हे जयदेवश्रेष्ठी त्याचा उलगडा करतील!"

राजा म्हणाला, "बोला जयदेवश्रेष्ठी, हा हार कुणाचा आहे? सगळं साद्यंत सांगा."

आणि मग जयदेवश्रेष्ठींनी त्या हाराचा साद्यंत वृत्तान्त राजाला कथन केला. तो ऐकूनही राजाच्या मनात चलबिचल चालूच राहिली. कारण आता खुद्द त्या राजाला त्या मौल्यवान रत्नहाराचा मोह पडला होता, लोभ सुटला होता. परशुरामानेही जलदिव्य केलेच पाहिजे, असा त्याने एकसारखा आग्रह धरला. हा आग्रह मानायचा नाही असे म्हटले तर तो रत्नहार परत हाती येणे कठीण दिसू लागले. त्यामुळे परशुराम नाइलाजाने तळ्यात उतरायला सिद्ध झाला. त्याने आपल्या कुलदेवतेचे स्मरण करून त्या तळ्यात प्रवेश केला मात्र; तत्क्षणी सरसर करीत एक भला थोरला मगर पुढे आला आणि त्याने परशुरामाला आपल्या पाठीवर घेतले. मग तो मगर फुललेल्या कमळाच्या दिशेने पोहोत गेला. परशुरामाने चांगली चारपाच निळी कमळे तोडून घेतली आणि तो मगराच्या पाठीवरूनच तळ्याच्या वरच्या पायरीवर आला. हे अद्भुत् दृश्य पाहिल्यावर तिथे जमलेल्या शेकडो लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. त्या टाळ्यांचा अर्थ 'तो रत्नहार परशुरामाचा आहे' असा होत होता. एवढ्यात ते जलकुंड ज्या चंडिका देवीच्या मंदिरापुढे होते, त्या मंदिरातील पुजाऱ्याने देवीच्या गळ्यात घातलेला ताजा टवटवीत पुष्पहार बाहेर येऊन परशुरामाच्या गळ्यात घातला. आता हाराचा मालक नि:संशयपणाने परशुराम आहे, हे सिद्ध झाले होते, तरीही राजाला तो हार सुखासुखी परशुरामाच्या हाती देणे बरे वाटले नव्हते. त्यामुळे त्याने आणखी एक खोडा टाकून पाहायचे ठरवले. तो म्हणाला,

"इथं झालेला निवाडा आपल्याला खरा धरता येणार नाही. याविषयी राजदरबारात सर्व मंत्र्यांच्या, सरदारांच्या आणि अन्य मानकऱ्यांच्या उपस्थितीतच निर्णय देता येईल. तेव्हा आता सर्वांनी उद्या दरबारात यावं."

एवढं म्हणून राजा हार घेऊन तिथून चालता झाला. जयदेवश्रेष्ठी आणि परशुराम या दोघांनाही राजाच्या या वर्तनाचा उलगडाच

होईना. तथापि हार परत मिळेपर्यंत धिमेपणाने अन् शांतपणानेच वागणे श्रेयस्कर होते. दोघेही बिचारे निमूटपणे जयदेवश्रेष्ठींच्या पेढीवर परतले.

त्या दिवशी नियोजित वेळी दरबार सुरू झाला आणि बरीच कामे होऊन संपलाही. परंतु रत्नहाराच्या निवाड्याचे प्रकरण चर्चेला आलेच नाही. आता मात्र परशुराम अस्वस्थ झाला. त्याला राजाचे वर्तन संशयास्पद वाटू लागले. तो हार गिळंकृत करण्याच्या हेतूने राजाने ही टाळाटाळ चालवली आहे, असे त्याच्या लक्षात येऊन चुकले. तो काहीसा संतापून जयदेवश्रेष्ठींना म्हणाला,

''तुमच्या देशाचा हा राजा मला लफंगा वाटतो. हा हार स्वत:च्या तिजोरीत भरती करण्याचा त्याचा डाव दिसतो. तसं जर त्यानं केलं तर, मग त्याचा सर्वनाशच ओढवला आहे, असं म्हणावं लागेल. कारण हा रत्नहार कांपिल्य नगरीच्या राजाचा आहे. तो इतका मौल्यवान आहे की, त्याच्या प्राप्तीसाठी कांपिल्याचा राजा युद्ध केल्याशिवाय राहणार नाही. मला वाटतं, तुमच्या राजानं या गोष्टीचा जेवढ्या गांभीर्यानं विचार करायला हवा, तेवढा केलेला दिसत नाही.''

परशुरामाचे हे सात्त्विक संतापाने भरलेले लांबलचक भाषण ऐकूनही जयदेवश्रेष्ठी शांतच होते. ते थोडे थांबून म्हणाले,

''परशुरामपंत, तुमचं म्हणणं खरं आहे; परंतु मला वाटतं आपण घाई केल्यामुळे हे प्रकरण अधिक जटिल बनण्याचा धोका आहे. हा रत्नहार तुमच्या स्वाधीन व्हायलाच हवा पण आपण आणखी थोडे दिवस शांत राहू....''

''तुम्ही शांत राहा. मला ते शक्य नाही. हार मी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलाय, हातात घेऊन पाहिलाय. तो आता तुमच्या राजाने स्वत:च्या तिजोरीत दडपलाय, हे ही मी पाहिलंय. आता हे सर्व वृत्त मी कांपिल्यपुराधिशाला जाऊन सांगतो. कांपिल्यपुराधिशाला काय उत्तर द्यायचं, कसं उत्तर द्यायचं, हे तुम्ही नि तुमचा हा हट्टी अन् लोभी राजा यांनी पाहावं. मी चाललो.''

परशुरामाच्या या निकराच्या बोलण्यावरही जयदेवश्रेष्ठी शांतच

होते. ते गंभीरपणे म्हणाले, ''पंत, तुमची मन:स्थिती मी जाणतो. तरीही उतावळे होऊ नका. अजून चार-सहा महिने इथंच राहा. हा रत्नहार मी स्वत: तुमच्या स्वाधीन करीन; मगच तुम्ही जा. माझं ऐका. तुमच्यापेक्षा मी चार पावसाळे जास्त पाहिलेत, हे लक्षात घ्या.''

परशुरामाचा मग नाइलाज झाला. तो मनातल्या मनात चरफडत जयदेवश्रेष्ठींकडेच राहिला.

या घटनेला चार महिने लोटले.

त्याच नगरीत गुणधवल नावाचा एक मंत्री होता. त्याची बायको अत्यंत रूपवान आणि नाजूक, सुंदर होती. तिचे नावचमुळी सुंदरी असे होते. एके दिवशी ती स्नानासाठी नदीवर गेली असताना एका यक्षाने तिला पाहिले आणि तो तिच्यावर मोहित झाला. गुणधवल त्या वेळी राजवाड्यात काही कामासाठी गेला होता. त्याला घरी परत यायला उशीर होणार होता. ही संधी साधून यक्षाने गुणधवल मंत्र्याचे रूप धारण केले अन् तो थेट त्याच्या घरी गेला. आपला धनी अपेक्षेपेक्षा लवकर आलेला पाहून द्वारपाल काहीसे आश्चर्यचकित झाले. तोच गुणधवलाचे रूप धारण केलेला यक्ष त्यांना म्हणाला, ''हे पाहा, अलीकडे गावात ठकांचा सुळसुळाट झाला आहे. माझं रूप घेऊन एक ठक अनेकांना लुबाडतो, असं मी ऐकलं आहे. तेव्हा सख्त लक्ष ठेवा नि असा कुणी इथं आला तर, त्याला धक्के मारून घालवून द्या.''

द्वारपाल 'बरं' म्हणाले. यक्ष आत गेला. वाड्यात शिरताच तो सरळ सुंदरीच्या महालात प्रविष्ट झाला. अकल्पितपणे पती आलेला पाहून ती चमकली, घाबरली; परंतु त्याचे तेजस्वी, हसरे नि प्रसन्न मुखमंडल पाहून तिला धीर आला. ती काहीशी लाजून, सावरून बसली. यक्ष तिच्याजवळ जाऊन नि तिच्या खांद्यावर हात ठेवून लाघवीपणाने बोलू लागला,

''प्रिये, मी अनपेक्षितपणे तुझ्या महालात प्रवेश केल्यामुळे तू घाबरलीस; खरं ना? परंतु घाबरण्याचं कारण काहीच नाही. आज वाटलं होतं, त्याच्या आधीच राजवाड्यातलं काम संपलं.

म्हटलं, आता आज जरा लवकर जाऊन बाईसाहेबांना खूष करावं एरवी वेळ होत नाही, आज 'त्यांच्याजवळ बसून त्यांचा रुसवा दूर करावा....''

असे बोलत असताना यक्ष तिच्या जास्त जास्त जवळ जाऊ लागला. सुंदरीला त्याची ती लगट आवडली नाही. ती दूर सरकत काहीशी रागाने म्हणाली,

''चला; दूर व्हा. एक शब्द बोलू नका माझ्याशी. सदान्‌कदा मेली राजवाड्यातली कामं. एक दिवस काही बायकोशी निवांत बोलायला फुरसद आहे का? जा, आज मीपण तुमच्यावर रागावलेय. मी नाही आज बोलणार!''

असे म्हणून तिने चक्क त्याला तिथून घालवून दिले. यक्षानेपण मग फार वाढवले नाही. तो निमूटपणे तिथून निघून गेला.

इकडे राजवाड्यातले सर्व महत्त्वाचे कामकाज संपवून खरा गुणधवल आपल्या घरी परतला आणि नेहमीच्या सवयीने वाड्यात प्रवेश करू लागला; परंतु आज त्याला नित्याप्रमाणे द्वारपालांनी उत्थापन तर दिले नाहीच, उलट त्याचा दंड धरून त्याला आत जाण्यास प्रतिबंध केला. गुणधवलाला हा प्रकार चमत्कारीक वाटला. तो संतापला आणि आत जाण्यासाठी द्वारपालांशी धिंगामस्ती करू लागला. त्याबरोबर द्वारपालांनी दणकट हातांनी त्याला दोन चांगले तडाखे लावले. त्या प्रकाराने गुणधवलाला वेड लागण्याची पाळी आली. आपल्याच वाड्यात जाऊ देण्यास आपल्याला विरोध का, हे त्याला कळेना. तो लांब उभा राहून ओरडला,

''मूर्खांनो, तुमची डोकी ठिकाणावर आहेत का? खुशाल आपल्या मालकावरच हात चालवता. म्हणजे पगार माझा घेऊन माझ्याशीच दांडगाई! खासा न्याय!''

त्यावर एक द्वारपाल हसून म्हणाला,

''तू मालक होय रे माकडा! लेका, मालक मघाशीच आत गेले. त्याचं सोंग घेऊन वाड्यात प्रवेश मिळवू पाहणारा तू ठग आहेस आणि वर हमरीतुमरी करतोस? थांब, आतून आमचे मालक बाहेर आले की कळेल इंगा!''

एवढी बोलाचाली होत आहे तोच गुणधवलाच्या रूपातला यक्ष वरच्या सज्ञातून खाली डोकावला आणि द्वारपालांना उद्देशून ओरडला,

"अरे रामप्रसाद, सांबप्रसाद, बघता काय! मुसक्या बांधा त्या हरामखोराच्या अन् घेऊन जा त्याला राजाकडे. म्हणावं, हाच तो लफंगा, साऱ्या शहरभर धुमाकूळ, घालून याने आता प्रत्यक्ष मंत्री गुणधवलांनाच ठकवायचं ठरवलेलं दिसतंय."

झालं! प्रत्यक्ष धन्याचीच आज्ञा झाल्यावर ते द्वारपाल काय स्वस्थ बसतात थोडेच! त्यांनी चपळाई करून खऱ्या गुणधवलालाच तोतया ठक ठरवले अन् त्याच्या मुसक्या बांधून त्याला राजवाड्याकडे चालवले.

राजाने सर्व प्रकार ऐकून घेतला आणि घोषित केले की, उद्या दरबार भरल्यावर या गोष्टीचा छडा लावण्यात येईल.

दुसऱ्या दिवशी दरबार भरला. खरा मंत्री गुणधवल राजसेवकांच्या पहाऱ्यात दरबारात आला, तेव्हा त्याने पाहिले की, आपल्या नेहमीच्या उच्चासनावर हुबेहूब दिसणारा एक माणूस बसला आहे. हाच खरा ठक आहे, हे गुणधवलच्या तेव्हाच लक्षात आलं; पण त्या दोघांपैकी खरा ठक कोणता अन् खरा गुणधवल कोणता, याचा निवाडा राजानेच आता करायचा असल्याने तो स्वस्थ राहिला.

मग दरबार सुरू झाला. राजाने आरंभीच सभाजनांना सर्व प्रकार खुलासेवार निवेदन करून म्हटले,

"या प्रकरणाचा योग्य तो न्याय जो करील, त्याला मी एक कोटी रुपये इथल्या इथं देईन. मात्र लक्षात ठेवा, न्याय बरोबर झाला पाहिजे. काटेतोल झाला पाहिजे. त्यात थोडाही दोष राहिल्यास न्याय करणाऱ्याला हत्तीच्या पायी देण्यात येईल."

राजाची ही घोषाणा ऐकल्यावर सारा दरबार तटस्थ झाला. कोणीही काहीही बोलेना. पण योगायोगाची गोष्ट अशी की, या प्रकरणाविषयी कुतूहल वाटून जयदेवश्रेष्ठी आणि परशुराम हे दोघेही त्या दरबारात उपस्थित होते. दरबारात कुणीच काही बोलत नाही, असे पाहिल्यावर परशुरामाला स्वस्थ बसवेना. तो एकदम उठला

आणि धीरगंभीरपणे म्हणाला,

''मी न्याय करण्यास सिद्ध आहे!'' त्याबरोबर दरबारातल्या सर्व जणांनी त्याच्याकडे चमकून पाहिले. राजाने परशुरामाचा रत्नहार लुबाडला असल्यामुळे त्यालाही परशुरामाला तिथे पाहून चमत्कारिक वाटले; पण आता काही उपाय नव्हता. नाइलाजाने त्याने परशुरामाला न्याय करण्याची अनुज्ञा दिली.

मग परशुरामाने सर्व राजसभेला उद्देशून म्हटले, ''मी केलेला न्याय या दोन्ही मंत्र्यांना, गुणधवल नावाने वावरणाऱ्या या दोन्ही पुरुषांना मान्य आहे का?''

असे विचारून परशुराम थोडा थांबला त्याने आळीपाळीने दोघाही मंत्र्यांकडे पाहिले. दोघाही मंत्र्यांनी ''होय, आम्ही तुमचा न्याय मान्य करू,'' असे म्हटल्यावर परशुरामाने एक सुवर्णाचा कमंडलू मागवून घेतला. नंतर तो कमंडलू सभाजनांसमोर धरून म्हटले,

''आता हा कमंडलू पाहा. याच्या एका बाजूला पाणी ओतण्याच्या सोईसाठी एक चोचीसारखी तोटी केली आहे. या तोटीतून जो बाहेर येऊन दाखवील, तो खरा गुणधवल मंत्री आहे.''

परशुरामाचं. ही सूचना ऐकताच उच्चासनावर बसलेला यक्ष पटकन् उठला नि लहानसे रुप धारण करून त्या कमंडलूत शिरला अन् लगेच तोटीतून बाहेर आला. हा चमत्कार पाहताच परशुराम एकदम ओरडला,

''हा पांहा तो तोतया मंत्री! कोणाही माणसाला एवढ्या लहानशा कमंडलूत प्रवेश करणंदेखील शक्य नाही. असं असताना ज्याअर्थी हा या तोटीतून बाहेर आला, त्याअर्थी हा कोणी अतिमानवी सृष्टीतला यक्षराज असावा....''

परशुराम एवढे बोलतो आहे तोच तो यक्ष तिथून अदृश्य झाला. तो गेल्यावर खऱ्या मंत्री गुणधवलाला राजाने मुक्त केले. सगळ्या दरबारीजनांनी त्याला आणि त्याचा काटेतोल न्याय करणाऱ्या परशुरामाला उठून अभिवादन केलं. मंत्री गुणधवल विनयाने राजाकडे वळून म्हणाला,

"महाराज, आताच आपण घोषित केल्याप्रमाणे यांना एक कोटी रुपये द्यावे."

त्यावर राजा तुच्छतेने म्हणाला, "मंत्री गुणधवल, हा माणूस आपल्या देशात परका आहे. त्यानंच हे सारं मायाजाल उभं केलं होतं. माझ्याकडून पैसे उकळण्यासाठी त्याचे हे डावपेच आहेत. मी ते चालू देणार नाही."

राजाचे हे अप्रामाणिकपणाचे बोलणे ऐकून मंत्री गुणधवलला तर चीड आलीच; पण कधी न संतापणारे जयदेवश्रेष्ठीही आता संतापले. रागाने लालबुंद होत ते गरजले,

"महाराज, हा विश्वासघात आहे अन् तुमच्यासारख्या सर्वोच्च स्थानावर विराजमान झालेल्या माणसाला तो शोभत नाही. तुम्ही स्वत: होऊन एक कोटी रुपये देण्याचं कबूल केलंय. ती रक्कम तर तुम्ही परशुरामपंतांना द्यायलाच हवी; शिवाय त्यांच्यासारख्या विदेशी नागरिकाचा भर दरबारात अपमान केल्याबद्दल, त्यांची जाहीर क्षमा मागायला हवी. तुम्ही आम्हा सर्वांचे राजे आहात, हे विसरू नका. तुम्ही दाखवलेला एखाद्याविषयीचा अविश्वास, तुम्ही केलेला एखाद्याचा घोर अपमान हा केवळ तुमच्याच पुरता राहत नाही. तुमच्याबरोबर आम्हीही त्याचे धनी ठरतो. अन् आम्हाला आपली ही वर्तणूक मान्य नाही. मी या शहरातील एक प्रतिष्ठीत नागरिक म्हणून आपणाला विनम्रतापूर्वक सांगतो की, आपण परशुरामपंतांना एक कोटी रुपये द्या, त्यांची क्षमा मागा, त्यांचा सन्मान करा, तुम्हाला ठाऊक नसेल तर सांगतो, पंत केवळ कोणी सामान्य विदेशी नागरिक नाहीत. ते कांपिल्यनगरीच्या प्रधानमंत्र्यांचे ज्येष्ठ चिरंजीव आहेत. त्यांना दुखावणं, अपमानीत करणं हा आपला राष्ट्रीय अपराध ठरेल!"

जयदेवश्रेष्ठी बोलायचे थांबले पण त्यांच्या भाषणाने प्रभावित झालेला सगळा दरबार एकमुखाने राजाला आवाहन करू लागला,

"महाराज, जयदेवश्रेष्ठींचं म्हणणं खरं आहे. त्यांचा आपण आदर केला पाहिजे."

राजाचा मग नाइलाज झाला. त्याने सर्वांसमक्ष एक कोटी

रुपयांची रक्कम परशुरामाला देऊ केली. पण त्याने ती स्वीकारली नाही. तो म्हणाला,

''हे पैसे तुमच्या नगरविकासार्थच खर्ची पडू दे. मला त्यांचा लोभ नाही.''

परशुरामाचे हे धीरोदात्त वर्तन पाहून सगळा दरबार चकीत झाला. राजाचेही मन आता पलटले. त्याने एका नोकराला आज्ञा देऊन तो तिजोरीतला अमौलिक रत्नहार मागवून घेतला आणि स्वहस्ते परशुरामाच्या गळ्यात घातला. पुढच्याच क्षणी तो खाली वाकला अन् त्याने परशुरामाच्या चरणांना वंदन केले. परशुरामाने त्याला वरच्यावर उचलून गाढ मिठी मारली. परशुरामाच्या गळ्यात रुळणाऱ्या त्या रत्नहारातल्या असंख्य रत्नांच्या प्रकाशशलाका साऱ्या दरबारात लखलखते, चमचमतं नृत्य करीत होत्या.

❈ ❈

क्र. ३०२६ १२/९/९६

## २.

# रजुली आणि मालुसाही

बैराट नावाचा एक देश होता. तिथे एक राजा राज्य करीत होता. त्याचे नाव दुलासाही. दुलासाही हा मोठा प्रजावत्सल राजा होता. आपल्या राज्यात कोणी दुःखी असू नये, संकटात असू नये, कोणी उपाशी - तापाशी राहू नये, सर्वजण सुखी असावेत, असे त्याला वाटे आणि त्यासाठी तो सदा दक्ष राही. राजाच्या या वृत्तीमुळे तो प्रजाजनांना देवासारखा पूजनीय ठरला होता.

असा हा दुलासाही राजा स्वतःच्या मनात मात्र फार फार दुःखी होता. आणि याचे कारण म्हणजे, अजून तो निपुत्रिक होता. त्याला पुत्र नव्हता. आपल्याला पुत्र व्हावा म्हणून त्याने अनेक व्रतवैकल्ये केली, ब्राह्मणांना दाने दिली, गोरगरिबांना अन्नवस्त्र दिले, तिर्थयात्रा केल्या - सगळे काही केले; परंतु त्याला पुत्रप्राप्ती काही होईना. राजा नि राणी दोघेही अगदी निराश होऊन गेले. अखेर एक दिवस त्यांच्या दारी एक बैरागी आला आणि त्याने राजाला पुत्रप्राप्तीचा एक उपाय सांगितला. तो राजाला म्हणाला,

''राजा, तू एवढी व्रतवैकल्ये केलीस, दानधर्म केलास, तीर्थयात्रा केल्यास सगळं खरं, पण बागनाथच्या देवीच्या दर्शनाला काही गेला नाहीस. खरं म्हणजे तू तिचं दर्शन आधी घ्यायला हवं होतंस; कारण ती तर तुझी कुलदेवता. असं असताना तू नेमका तिलाच कसा विसरलास? अजून वेळ गेली नाही. तू तुझ्या राणीसह बागनाथच्या देवीदर्शनाला जा, तिची करुणा भाक,

झाल्या अपराधाची क्षमा माग. असं केलंस की, ती तुला पुत्रदान केल्याशिवाय राहणार नाही. तशी ती प्रेमळ अन् क्षमाशील आहे,'' असे सांगून बैरागी चालता झाला.

बैराग्याचे म्हणणे राजाला पटले. त्याने दुसऱ्याच दिवशी बागनाथच्या यात्रेचे प्रस्थान ठेवले.

गंमत अशी की, सौक्याण देशाचा धनाढ्य व्यापारी सुवर्णधर हाही या वेळी अशीच पुत्रप्राप्तीसाठी व्रतवैकल्ये करीत होता. राजाला ज्या बैराग्याने बागनाथच्या देवतेचे दर्शन घ्यायला सांगितले, त्यानेच सुवर्णधरलाही त्याच देवतेचे दर्शन घ्यायला सांगितले होते आणि त्या देवतेच्या आराधनेमुळे तुला पुत्रप्राप्ती होईल, असे म्हटले होते. बैराग्याचे हे सांगणे ऐकून सुवर्णधर व्यापारी हाही आपल्या गंगुली नावाच्या धर्मपत्नीसह बागनाथच्या वाटेवर चालत होता.

आपल्याला पुत्रप्राप्ती झाली तर आपण बागनाथच्या देवीला सोन्याचा मुकुट समर्पण करू, असा राजाने नवस केला होता. सुवर्णधर व्यापाऱ्यानेही असाच नवस केला होता. त्याला पुत्र झाला की, तो देवीच्या कानात भारी, हुरमुजी मोत्यांच्या बाळ्या चढवणार होता.

बागनाथचे मंदिर काही मैल अंतरावर राहिले असतानाच रात्र झाली. राजा-राणी आणि व्यापारी नि त्याची पत्नी नेमके एकाच धर्मशाळेत शेजारी शेजारी उतरले. प्राथमिक श्रमपरिहार झाल्यावर दोन्ही जोडपी त्या धर्मशाळेतच झोपी गेली. त्या रात्री बागनाथची देवी राणीच्या स्वप्नात गेली आणि म्हणाली,

''लवकरच माघ संक्रांतीचं पर्व येईल. त्या दिवशी तू पंचपंचउषःकाली ऊठ अन् शरयू-गोमतीच्या संगमावर थंड पाण्याने स्नान कर. वेणीमाधवास आणि त्रिजुगी पिंपळवृक्षाला पाणी घाल. मग सातू आणि तीळ यांचा होम कर आणि त्यानंतर माझ्या मंदिराचं फाटक उघडण्यापूर्वी तू तिथं ये. तू लवकर आलीस तर तुला पुत्र मिळेल. उशीर केलास तर कन्या मिळेल.''

असाच दृष्टान्त देवीने व्यापाऱ्याच्या पत्नीलाही दिला.

सकाळ उजाडताच दोघींनीही आपापल्या नवऱ्यांना हा

स्वप्नदृष्टान्त सांगितला आणि देवीच्या देवळात आपणच लवकर पोचले पाहिजे, असेही बजावले. दोन्ही जोडपी रात्रभर त्या धर्मशाळेत जवळ जवळ राहिली होती; परंतु दोन्ही जोडप्यांनी आपण कुठे जात आहोत, हे परस्परांपासून लपवून ठेवले होते.

बागनाथाला पोचल्यावर राजा-राणी कत्युरी मठात उतरली तर, व्यापारी अन् त्याची पत्नी तिथून जवळच असणाऱ्या शौकिया नामक एका लहानशा गावात राहिली. स्वाभाविकच राणी बागनाथच्या मंदिरात अगोदर पोहचली आणि देवीने पुत्रप्राप्तीचा वर दिला. व्यापाऱ्याची पत्नी गंगुली उशीरा गेल्यामुळे देवीने 'तुला कन्यारत्न होईल' असा तिला वर दिला. तो वर ऐकून पुत्रप्राप्तीसाठी आसुसलेली गंगुली काहीशी खट्टू झाली; परंतु तिच्या पतीने तिची समजूत काढली.

अशा प्रकारे देवीकडून संतानप्राप्तीचा वर मिळवून दोन्ही जोडपी आपापल्या गावी परतली.

या गोष्टीला नऊ - दहा महिने उलटले. राणीला मुलगा झाला. राजाने त्याचे नाव मालूसाही ठेवले.

गंगुलीला मुलगी झाली. सुवर्णधर व्यापाऱ्याने तिचे नाव रजुली असे ठेवले.

दोन्ही मुले आपपल्या घरी दिसामासी वाढू लागली.

मालूसाही आपल्या बापासारखाच देखणा, सुंदर, चपळ नि बलसंपन्न होता. त्याची बुद्धी कुशाग्र होती. तो एकपाठी होता. चतुर आणि शहाणाही होता. लवकरच तो शस्त्रविद्येत नि राजनीतिशास्त्रात प्रविण झाला.

सुवर्णधराची मुलगी ही तर सोनचाफ्याच्या फुलासारखी नाजुक अन् तेजस्वी दिसू लागली. जसजशी ती मोठी होऊ लागली तसतशी आणखीच सुंदर नि मोहक दिसू लागली. ती देखील मालूसाही सारखीच चुणचुणीत नि हुशार होती. ती आपल्या आईला नेहमी प्रश्न विचारी,

"आई, मला सांग, सगळ्या अन्नात अत्यंत चांगलं नि पौष्टिक अन्न कुठलं ?"

आई उत्तर देई. ''तीळ हे सर्वात चांगलं नि पौष्टिक अन्न.''

पाठोपाठ रजुलीचा दुसरा प्रश्न तयारच असे.

''बरं, आता मला सांग, सगळ्या झाडात कोणतं झाड पवित्र आणि पूजनीय आहे?''

आई सांगे, ''पिंपळाचं झाड हे पवित्र आहे नि पूजनीय पण आहे.''

आता तरी रजुलीनं गप्प बसावं की नाही! पण छे! ती लगेच विचारी.

''सगळ्या राजांत कोणता राजा शूर, पराक्रमी आणि थोर आहे, सांग बघू.''

आई म्हणे, ''सगळ्या राजांत शूर, पराक्रमी अन् थोर असा राजा एकच आहे आणि तो म्हणजे बैराटचा राजा.''

मग रजुली आईला पुन्हा म्हणे,

''आई, त्याचं नाव काय गं?''

''त्याचं नाव आहे दुलासाही. पण खरं सांगू मुली, तो झालाय आता म्हातारा. पिकलं पान! केव्हाही गळून पडेल. बैराटचा राजा आता खरं म्हणायचं म्हणजे तो नव्हेच! आता मालूसाही ह.च तिथला राजा!''

''मालूसाही? हा कोण मालूसाही. कधी नाव नाही ऐकलं त्याचं!'' रजुली कुतूहलाने विचारी; पण आईला तिचे हे प्रश्नांमागे प्रश्न मुळीच आवडत नसत. ती त्रासून म्हणे,

''असेना का कुणीही. तुला काय करायचंय?''

''अग पण अशी करवादतेस का?'', रजुली आईला म्हणे, ''तुला काय वाटतं, तू नाही सांगितलंस मालूसाही कोण ते, तर मला काही कळणार नाही, आई, मग मीच सांगते, ऐक चांगले कान उघडे ठेवून ऐक. मालूसाही हा बैराटचा राजपुत्र आहे, उद्याचा राजा आहे. आणि आणखी सांगते, तो माझा भावी पती आहे. मी त्याला पाहिलंय आणि मनानं वरलंय!''

रजुलीचे हे विलक्षण आत्मविश्वासपूर्ण भाषण ऐकून गंगुली चकितच झाली. ती आधी काही बोलली नाही पण मग मात्र

तिला रजुलीचा खूप राग आला. ती कडाडली,

"कार्टे, काय बोलतेस काय तू? म्हणे तो माझा भावी पती आहे! काही जिभेला हाड! अगं, किती झालं तरी तो राजपुत्र. तुला काय तो पदरात घेणार? ते काही नाही, मी तुझ्यासाठी चांदकुमार हुणिया नावाचा एक छानसा नवरा बघून ठेवलाय. तुझ्या वडिलांनापण तो पसंत आहे. हवं तर तू सुद्धा एकदा त्याला पाहा. मात्र लक्षात ठेव, तुझं लग्न होईल तर चांदकुमार हुणियाशीच."

"आई, लग्न तुला करायचं नाही तर मला करायचंय. तेव्हा तुझी नि बाबांची पसंती माझ्या कामाची नाही."

माय-लेकींचा असा कडाक्याचा वाद झाला. लेकीच्या या ठाम उत्तरामुळे आई तेव्हा चूप बसली; परंतु तिला आपला अपमान झोंबला होता. शिवाय, तिने 'मी माझ्या लेकीचं लगीन तुझ्याशी नक्की लावून देईन;' असं चांदकुमार हुणियाला वचन दिले होते. ते वचन भंग पावणार की काय, अशा काळजीने ती ग्रासून गेली.

या घटनेला चार दिवस उलटले. रजुलीची आई गंगुली अजूनही त्या दिवशीच्या अपमानाने ःनातल्या मनात धुसफुसत होती. प्रसंग सापडताच ती रजुलीला फैलावर घेत होती. आईच्या या वर्तनाचे रजुलीला मोठे नवल वाटत होते. चांदकुमार हुणियाशी आपले लग्न लावण्याचा तिचा एवढा हट्ट का आहे, हे तिला कळेना.

रजुली सुखासुखी आपले म्हणणे ऐकत नाहीसे पाहून, गंगुली तिला तिच्या वडिलांचे नाव सांगून धाक घालीत होती. त्यामुळे रजुलीने एकदा आपल्या वडिलांनाच विचारून या प्रकरणात त्यांचा हट्ट कितीसा आहे, हे समजावून घ्यायचे ठरवले.

एके दिवशी सकाळी ती आपल्या वडिलांना गोडीगुलाबीने म्हणाली,

"बाबा, हा चांदकुमार हुणिया कोण आहे हो?"

"चांदकुमार? कोण चांदकुमार?" वडिलांनी न समजून

विचारले.

"चांदकुमार ठाऊक नाही तुम्हाला, बाबा? अहो, आईनं त्याच्याशी माझं परस्पर लग्न ठरवलंय. मलादेखील विचारलं नाही तिनं. उलट, तुम्हाला तो पसंत आहे नि तुमचीपण त्याच्याशीच मी लग्न करावं अशी इच्छा आहे, असं आई मला सांगते. खरंच बाबा, तुम्हालाही वाटतं मी त्याच्याशी लग्न करावं म्हणून?" रजुलीचा स्वर कातर झाला. डोळे भरून आले.

आपल्या लेकीची ती करुण अवस्था पाहिल्यावर सुवर्णधर व्यापाऱ्याचे अंत:करण कळवळले. त्याने रजुलीला जवळ घेतले नि तिला कुरवाळून, थोपटून तो म्हणाला,

"नाही गं बेटा. तो कोण चांदकुमार हुणिया म्हणतेस, तो काळा की गोरा मला माहीतही नाही. हा सगळा तुझ्या आईचा हट्ट. तू तिचं ऐकत नाहीसे पाहून तिनं तुला धाक घालण्यासाठी माझं नाव सांगितलं, एवढंच काय ते. तू नको मनावर घेऊ तिचं."

पित्याचं हे असं अभयवचन ऐकल्यावर रजुली खुदकन हसली. खुषीत येऊन ती वडिलांच्या धोतराच्या सोग्याशी खेळत त्यांना म्हणाली,

"बाबा, तुम्ही किती चांगले आहात! माझं एक ऐकता?"

"होऽ! का नाही? सांग. काय म्हणतेस?" सुवर्णधर हसत म्हणाला.

"किनई, या खेपेला व्यापाराला जाताना मीही तुमच्या बरोबर येणार! तुम्ही व्यापार करा, मी बकऱ्यांना चारा-पाणी करीन. जंगलात चरायला घेऊन जाईन."

सुवर्णधर हसला. म्हणाला,"एवढंच ना, ठीक आहे. मी घेऊन जाईन तुला."

थोड्याच दिवसांनी सुवर्णधर रजुलीला घेऊन व्यापारासाठी घराबाहेर पडला. दोघेही गावोगाव फिरत होते. सुवर्णधर दिवसभर व्यापार करी आणि रात्री विश्रांतीसाठी मुक्कामाच्या ठिकाणी परते. रजुली बकऱ्यांना घेऊन जंगलात चरायला नेई आणि रात्री परत

येई. रात्रीच्या निवांत वेळी बापलेक चांदण्यात बसून हितगुज करीत.

एक दिवस रजुली बकऱ्यांना घेऊन रानात गेली असताना एका सुंदर निसर्गरम्य तलावाच्या काठी, झाडाच्या बुंध्याला टेकून विश्रांती घेत होती. मंद वारा वाहत होता. हवेत सुखद असा गारवा होता. दुपारची वेळ होती. एखादा - दुसरा पक्षी झाडावर किलबिलत होता. बाकी सर्वत्र शांतता होती. तलावाच्या पाण्यावर हलकेच वायुलहरी खेळत होत्या. त्यामुळे संथ पाण्यावर मजेदार वर्तुळे उठत होती नि मोठी मोठी होत विरून जात होती. रजुली एकतान होऊन हे नयनरम्य दृश्य पाहत होती. एवढ्यात तिच्या कानावर घोड्याच्या टापांचा आवाज येऊन आदळला. त्याबरोबर ती थोडी सावरून बसली. कान टवकारून ऐकू लागली. इतके होत आहे तोच, तो टापांचा आवाज तिच्या अगदी समिप येऊ लागला. पाठोपाठच एक तरुण, देखणा, सरदारासारखा तेजस्वी असा पुरुष तिच्या पुढ्यात येऊन थांबला.

तो मालूसाही होता. रजुली ज्याचे नाव ऐकूनच त्याच्यावर फिदा झाली, तो बैराटचा राजपुत्र अकल्पितपणे तिच्या समोर येऊन उभा राहिला होता. त्याला पाहून रजुली थोडी चमकली. मग हळूच विचारू लागली,

''तुम्ही कोण आहात? अन् मी इथं एकटी असताना असे अचानक माझ्यासमोर येऊन कसे उभे राहिलात?''

मालूसाही हसला. हसताना त्याच्या कोरीव मिशा मोठ्या सुरेख दिसल्या. तो म्हणाला,

''मुली, माझं नाव मालूसाही. बैराटचा राजपुत्र. शिकार शोधता शोधता सहजच इथं आलो. तू इथं असशील अशी माझी कल्पनाच नव्हती. मी काही तुला ओळखत नाही. तुझं नाव सांगितलंस तर, अन् तू कुणाची कोण तेही कळलं तर मला फार बरं वाटेल!''

रजुली त्याच्या सौम्य भाषणाने आणि देखण्या सुंदर व्यक्तिमत्वाने सुखावली.

आपण ज्याचे नुसते नाव ऐकूनच मनाने ज्याला वरले होते,

तोच हा मालूसाही आहे, हे कळल्यावर तर तिचा हर्ष अगदी गगनात मावेनासा झाला. ती किंचित लाजून, संकोचून, पायाच्या अंगठ्याकडे बघत उगीच उभी राहिली. मालूसाहीलाही ती फार फार आवडली. त्याने आवाजात कमालीची कोवळीक आणून तिला विचारले,

"मुली, तू मला मनोमन आवडलीस. तुझं नाव काय? तू कुणाची कोण? या अशा शांत वेळी या तलावाकाठी तू कशासाठी बसली आहेस?"

त्याच्या या प्रश्नांच्या भडिमारामुळे रजुली आणखीच बावरली. ती थरथरत एक एक शब्द बोलू लागली,

"मी...मी रजुली. इथल्या सुवर्णधर व्यापाऱ्याची मुलगी. मी इथं.. इथं बकऱ्या चारायला म्हणून आले नि जरा विसाव्याला या सावलीत टेकले...तेवढ्यात तुम्ही इथं आलात. .."

रजुलीचे हे मर्यादशील वागणे नि लाजत - बावरत बोलणे बघून मालुसाहीला मोठी गंमत वाटली. तो रजुलीला धीर देऊन म्हणाला,

"घाबरू नकोस रजुली. मी कोणी असभ्य, उतावळा तरुण नाही. माझ्यावर विश्वास ठेव. माझं खरोखरीच तुझ्यावर प्रेम आहे नि तुझी माझी जन्माची गट्टी व्हावी असं मला वाटतं; परंतु तुझ्या आई - वडिलांची, तुझी संमती घेतल्याशिवाय मी कोणतंही पुढचं पाऊल टाकणार नाही, याची खात्री असू दे. आता मला सांग, तुझे वडील कुठे आहेत? मला ते केव्हा भेटतील?"

त्यावर अत्यंत हर्षभराने रजुलीने मालूसाहीला आपल्या वडिलांची भेट केव्हा, कुठे अन् कशी होईल ते सांगितले. ते ऐकून नि रजुलीचा हसून निरोप घेऊन मालूसाहीनं पुनश्च आपल्या घोड्याला टाच दिली आणि तो आल्या वाटेने निघून गेला. रजुली किती तरी वेळ त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत राहिली होती. अखेर सूर्य अस्ताला गेल्यावर ती आपल्या बकऱ्यांना घेऊन लगबगीने मुक्कामावर परतली.

त्या रात्री रजुलीने घडलेला सर्व प्रसंग आपल्या वडिलांना

सांगितला आणि ''मी लग्न करीन तर मालूसाहीशीच'' असेही बजावले. त्यावर सुवर्णधर व्यापाऱ्याने म्हटले,

''मालूसाही खरोखरीच मला येऊन भेटला तर, मी तुझं लग्न नक्की त्याच्याशीच लावीन; दुसऱ्या कुणाशीही लावणार नाही.''

वडिलांचे हे बोलणे ऐकून रजुली हर्षभरीत झाली. लवकरच ती आपल्या पित्याबरोबर घरी परतली; परंतु या मधल्या काळात मालूसाहीला रजुलीच्या वडिलांना काही भेटता आले नाही. त्यामुळे परिणाम व्हायचा तोच झाला.

रजुली आणि तिचा पिता सुवर्णधर हे दोघे घरी परतताच गंगुलीने 'रजुलीचे लग्न चांदकुमार हुणियाशीच होईल' असे जाहीर करून टाकले.

गंगुलीचा स्वभाव ,हट्टी आणि आक्रस्ताळा आहे, तिने एखादी गोष्ट करायची असे मनात ठरवले की ती केल्याशिवाय ती राहत नाही; हे आजवरच्या अनुभवावरून रजुलीला नि तिच्या पित्याला चांगले ठाऊक झाले हाते. त्यामुळे हे लग्न मोडायचे तर वितंडवाद करीत न बसता दुसराच काही तरी उपाय योजला पाहिजे, असे त्या रजुलीने आणि तिच्या पित्याने ठरवले.

चांदकुमार हुणियाचा एक मित्र होता. त्याचे नाव सूर्यकुमार लोहाणिया. तो घरचा फार गरीब होता आणि त्याचमुळे पैशांचा लोभही होता. त्याला बरेचसे रुपये दिले तर, तो चांदकुमारने रजुलीशी लग्न करु नये असा प्रयत्न करील, याची सुवर्णधर व्यापाऱ्याला खात्री होती. एका सायंकाळी त्याने सूर्यकुमारला आपल्या पेढीवर बोलावून घेऊन त्याला आपला मनोदय सांगितला. सूर्यकुमारने ही गोष्ट तत्काळ मान्य केली. मग सुवर्णधराने त्याला पाच सहस्त्र रुपये दिले आणि बजावले,

''आता तू एकच कर. चांदकुमार हुणिया काही केल्या रजुलीशी लग्न करायला तयार होणार नाही, असं पाहा. त्यासाठी तू चांदकुमारला काहीही सांगितलं तरी हरकत नाही.''

सूर्यकुमारने ''बरे'' म्हटले आणि पाच सहस्त्र रुपयांची थैली घेऊन तो तिथून बाहेर पडला.

सुवर्णधर व्यापारी आणि रजुली यांना या प्रसंगामुळे हायसे वाटले; परंतु लवकरच त्यांच्या भ्रमाचा भोपळा फुटला. सूर्यकुमारने त्यांना दिलेला शब्द पाळला नाही. उलट त्याने चांदकुमारला म्हटले,

''यदाकदाचित रजुलीशी तुझं लग्न होण्यात काही विघ्न आलंच, तर ते विघ्न आणणाऱ्या व्यक्तीला मी कंठस्नान घालीन. वाटेल ते झालं तरी रजुली तुझीच बायको झाली पाहिजे.''

सूर्यकुमारच्या या प्रतिज्ञेमुळे चांदकुमारचा उर त्याच्याविषयीच्या या अभिमानाने भरून आला.

लवकरच गंगुलीच्या म्हणण्याप्रमाणे रजुलीला चांदकुमारशीच लग्न करावं लागलं. बिचारी रजुली! आल्या प्रसंगाला निमूटपणे सामोरी गेली. मात्र सासरची वेस ओलांडून नवऱ्याघरी प्रवेश करताना तिला एकच चिंता जाळत होती, ती म्हणजे या चांदकुमारबरोबर त्याची बायको म्हणून वावरताना आपल्या नशिबी काय, काय भोगवटे येणार? कारण तिला त्याच्या विषयी जी काही माहिती ठाऊक झाली होती, ती काही चांगली नव्हती. किंबहुना वाईटच होती. तिने ऐकले होते, चांदकुमार एवढा क्रूर आहे की, त्याला नुसते पाहूनही जंगलातली वाघ - सिंहासारखे हिंस्त्र श्वापदं थरथर कापू लागतात. इतकेच काय, त्याच्या नुसत्या श्वासानेच त्यांची दाणादाण उडते. तो एका वेळी पाच - सहाशे किलोचा भात उठवतो.

असल्या राक्षसी वृत्तीच्या माणसाबरोबर हाल - आपेष्टा भोगत जगण्यापेक्षा गळफास लावून मेलेलं काय वाईट, असा विचार करीतच रजुलीने नवऱ्याच्या घरात पाऊल टाकले. त्या रात्री ती खूप दमली असल्यामुळे तिला तेव्हाच झोप लागली. सकाळी उठून पाहते तो तिच्या लक्षात आले, की आपल्याला एका अंधाऱ्या कोठडीत डांबून ठेवले आहे. तिला फार आश्चर्य वाटले. ती मनाशीच म्हणाली, 'ही काय बायकोला वागवायची रीत झाली?'

परंतु तिचे हे बोलणे ऐकायला जवळ होतेच कोण? तिने दरवाजा बराच वेळ खडखडवला पण कोणी आले नाही. रात्र झाली तसा एक म्हातारा पहारेकरी हातात एक भली मोठी वेळूची

भरीव काठी घेऊन तिच्या कोठडीच्या दाराकडे आला. त्याला पाहिल्यावर रजुली रडू लागली. म्हताऱ्याने तिची खूप समजूत काढली. तो तिला म्हणाला,

''मुली, मला तुझं दुःख कळतं. पण थोडी दमानं घे. हा चांदकुमार हुणिया मोठा दुष्ट माणूस आहे. तू त्याच्याशी गोडीगुलाबीनं वागलीस, तर तो तुला लवकरच इथून मुक्त करील; पण जर का तू त्याच्याशी धुसफुस सुरू केलीस तर मात्र तुझी खैर नाही!''

रजुलीने म्हाताऱ्याचे म्हणणे ऐकून घेतले आणि चांदकुमारशी नम्रपणाने वागायचे ठरवले.

दुसऱ्याच दिवशी चांदकुमार भरपूर खाद्यपदार्थ घेऊन तिच्या कोठडीत आला. तो येताच रजुलीने हसतमुखाने त्याचे स्वागत केले आणि म्हटले,

''यावं महाराज! म्हटलं दासीची आठवण तरी होते की नाही या राज्यकारभाराच्या व्यापतापात!''

रजुलीचे हे बोलणे ऐकून चांदकुमार अगदी खूष होऊन गेला. त्याने तिला मोठ्या प्रेमाने जवळ बसवून ते खाद्यपदार्थ भरवले. दोघांचे जेवण अगदी मजेत, हसत - खिदळत झाले. चांदकुमार आता खुषीत आहे, असे पाहिल्यावर रजुली हळूच म्हणाली,

''महाराज, एक विचारू!''

''खुशाल विचार! काय म्हणतेस?'' चांदकुमारने विचारले.

''परवा किनई, मी अगदी दमून गेले होते. त्यामुळे त्या दिवशी मी आल्या आल्या झोपले. तुम्हीदेखील या दोन दिवसांत मला या अगदी एकान्तजागी शांत विश्रांती घेऊ देण्याची व्यवस्था केली. खरंच, तुम्ही किती चांगले आहात! पण ते जाऊ दे. आज मी म्हणते, आपण नगरप्रदक्षिणेला जाऊ. नाही तर असं करू या का, आपण आज उद्यानविहाराला जाऊ.''

रजुलीचे हे बोलणे ऐकल्यावर चांदकुमार गडगडून हसला.त्याच्या हसण्याचा आवाज एवढ्यामोठ्याने घुमला की, रजुली थरथर कापू लागली. तथापि तिने तसे काही दाखवलं नाही. उलट ती पुन्हा

चांदकुमारच्या गळ्यात हात टाकून म्हणाली,

"खरंच! सांगा ना, जाऊया का आज उद्यान यात्रेला?"

चांदकुमार हुणिया घनगर्ज आवाजात म्हणाला, "बरं! बरं! जाऊ या बरं राणीसाहेब!" आणि त्या दिवशी संध्याकाळी ती दोघे नगराबाहेरच्या प्रशान्त उद्यानात फिरायला गेली. चांदकुमार आज फारच खूष होता. त्याने सपाटून मद्य प्राशन केले होते. त्यामुळे त्याचा एकसारखा तोल जात होता. त्याच्यामागे घोड्यावर बसलेल्या रजुलीला ही गोष्ट तेव्हाच कळून चुकली. ती सावध होती. तिने लाडीगोडीने त्याच्या हातातला घोड्याचा लगाम आपल्या हाती घेतला. लगाम हाती येताच तिने हळूच चांदकुमारला एक धक्का दिला. त्याबरोबर तो तोल जाऊन घोड्यावरून खाली कोसळला. चांदकुमार खाली कोसळलेला पाहताच रजुलीने घोड्याला अशी एक जोराची टाच दिली की, घोडा चौखूर उधळला. रजुलीने लगाम मात्र पक्का हातात धरला होता.

रजुली तिथून सुसाट निघाली ती मजल दरमजल कूच करीत एका तिन्हीसांजेला सोमेश्वर नावाच्या गावी येऊन पोचली. सोमेश्वर गावात ती शिरली तेव्हा तिन्हीसांज टळून गेली होती. दिवे लागले होते. चावडीपुढच्या पटांगणात लहान लहान मुली फेर धरून खेळत होत्या. रजुली त्यातल्या एका मुलीजवळ गेली नि म्हणाली,

"बाळ, मला थोडं पाणी आणून देतेस प्यायला? मी खूप दमून गेलेय गं!"

ती मुलगी "होऽ देते की!" असे म्हणत घराकडे पळाली. रजुली मग तिथल्याच एका दगडावर विसावली. थोड्याच वेळात त्या मुलीने तिला स्वच्छ पाण्याची लखलखीत लोटी आणून दिली. रजुलीने ते पाणी घटाघटा घशाखाली लोटले. पाणी पिऊन होताच तिला खूप हुशारी आली. श्रम हलके झाले. ती पुन्हा टवटवीत झाली. आणि आता ती घोड्यावर चढणार तोच, एकाएकी एक धटिंगण माणूस तिथे आला आणि त्याने तिचे मनगट आपल्या दणकट पंजाने धरले. त्यामुळे रजुली एकदम घाबरली. तिने हिसडा

देऊन त्याच्या तावडीतून स्वत:ला सोडवण्याचा प्रयत्न करून पाहिला; पण तो सोडीना. उलट म्हणू लागला,

''बरी सापडलीस! आता लग्न कर माझ्याशी!''

त्याने बोलण्यासाठी तोंड उघडले मात्र; एकदम त्याच्या तोंडाचा भपकारा रजुलीच्या नाकात शिरला. तो माणूस दारु प्यायला होता आणि त्यामुळे त्याचा तोल जात होता. रजुलीला पाणी आणून देणाऱ्या मुलीचा तो बाप होता. आपल्या बापाने या सुंदर मुलीला अशी ओढाताण करावी हे त्या चिमुरड्या मुलीला आवडले नाही. ती पटकन् खाली वाकली आणि एक अणकुचीदार दगड तिने नेम धरून आपल्या बापाच्या पाठीवर मारला. त्याबरोबर तो कळवळला; त्याचा हात ढिला पडला नि त्याच वेळी रजुलीने त्याला पुन्हा एक हिसडा दिल्यामुळे तो चांगलाच होलपटून पडला. रजुली त्याच्या तावडीतून सुटली. पटकन् तिने घोड्यावर मांड ठोकली अन् घोड्याला टाच देऊन ती तिथून पसार झाली.

ती सगळी रात्र रजुली रानावनांतून, जंगलांतून, डोंगर दऱ्यांतून सुसाट धावत होती. पहाटे ती बैराट देशाच्या राजवाड्याजवळ येऊन पोचली. अजून अंधार होता, त्यामुळे मालूसाही आपल्या महालात गाढ झोपेत होता. त्याला एक स्वप्न पडत होते. स्वप्नात एक सुंदर युवती त्याच्या गळ्यात सुगंधी पुष्पहार घालत होती. तो हे स्वप्न पाहत असतानाच बाहेर दरवाज्याजवळ घामाघूम झालेली, दमून भागून गेलेली रजुली उभी होती. राजवाड्यावर पहारा करणाऱ्या शिपायाला ती मालूसाहीला भेटण्यासाठी प्रवेश मागत होती. पहारेकरी तिला म्हणत होता,

''अभी रात बाकी है, महाराज अभी सो रहे है। तुम दोपहरपे आव।''

परंतु आपल्यामागे चांदकुमारचे शिपाई येत असतील या भीतीने रजुली त्याला पुन्हापुन्हा विनवीत होती,

''काहीही कर, परंतु मला आताच राजाकडे घेऊन चल.''

पण पहारेकऱ्याने तिचे काहीही ऐकले नाही. रजुलीचा मग नाइलाज झाला. तिने एका झाडाच्या पानावर आपल्या करंगळीच्या

रक्ताने मालूसाहीला उद्देशून पुढील प्रमाणे निरोप लिहिला -

"मी चांदकुमारचे घर सोडून केवळ तुमची पत्नी होण्यासाठी आले होते. परंतु तुमची भेट झाली नाही. आता मी सौक्याण देशाला, माझ्या माहेरी परत जाते. तुम्ही तिथं या अन् मला घेऊन जा.

- तुमची रजुली.

आणि हे पत्र तिने पहारेकऱ्याच्या हाती दिले. लगोलग ती घोड्यावर स्वार झाली आणि तिथून ती सौक्याण देशाकडे भरधाव निघाली.

सकाळी मालूसाही जेव्हा जागा झाला तेव्हा त्याला पहारेकऱ्याकडून रजुलीचे ते रक्तरंजीत पत्र मिळाले. त्याबरोबर तो लगोलग सौक्याण देशाकडे धावत सुटला.

सौक्याण देशात आल्यावर त्याने भिकाऱ्याचा वेश धारण केला आणि भीक मागत मागत तो रजुलीच्या घराजवळ आला रजुलीने त्याला तेव्हाच ओळखले; परंतु तो तिथे आला आहे असे कळले तर आपली आई गंगुली त्याला हरप्रयत्नाने ठार मारील, हे तिला ठाऊक होते. म्हणून मग तिने मालूसाहीवर मंत्र घालून त्याचे भुंग्यात रुपांतर केले. मग तिने त्या भुंग्याला घरात आणले व आईला म्हटले,

"आई, आई, काय सांगू माझ्या कर्माची दशा! तू ज्याच्याशी माझे लग्न लावून दिलेस तो हा चांदकुमार, एका साधूने त्याच्यावर मंत्र टाकल्यामुळे हा असा भुंगा होऊन राहिला. अहोरात्र माझ्या कानाशी गुणगुण करतो. आता तूच सांग मी याच्याशी संसार तरी कसा करणार?"

"मला तरी काय ठाऊक बाई हे असं होईल! आता तू असं कर, या भुंग्याला गावाबाहेर सोडून दे."

रजुलीला काय तेच हवे होते. ती भुंग्याला घेऊन तडक घराबाहेर पडली. तबेल्यात तिचा घोडा होताच. घोड्यावर बसण्यापूर्वी तिने त्या भुंग्यावर पुन्हा मंत्र टाकला. तत्काळ त्या भुंग्यातून मालूसाही बाहेर आला. मग त्याने रजुलीला उचलून घोड्यावर

घेतले, आपल्या पुढ्यात बसवले आणि तो बैराट देशाच्या रोखाने भरधाव धावू लागला. वाऱ्याच्या झोताने रजुलीचे केस उडत होते आणि ते मालुसाहीच्या नाकातोंडाजवळ येत होते. त्या केसांचा सुगंध त्याला धुंद करीत होता. दोघांचेही स्वप्न आता पुरे झाले होते. त्यामुळे दोघेही मोठ्या आनंदात होते. दूर पूर्वेकडे प्रभातीची कोवळी - सोनेरी किरणे चमचमत होती..

❖ ❖

# ३.

# धूला कुट्ट्या

एक होता राजा. त्याला मूलबाळ नव्हते, त्यामुळे तो आणि राणी सदैव दुःखी असत. एकदा एक साधू राजाच्या दारी भिक्षा मागायला आला. त्याने राजा - राणींना दुःखी पाहून त्यांच्या दुःखाचे कारण विचारले. राणी म्हणाली,

''आम्हाला मूलबाळ नाही. राज्याला वारस नाही, म्हणून आम्ही दुःखी आहोत.''

साधू म्हणाला,

''एवढंच ना, तुम्ही शंकराची पूजा करीत जा. शंकराच्या नावाचा जप करा. तुम्हाला मूल होईल.''

एवढं बोलून नि भिक्षा घेऊन साधू निघून गेला.

राजा-राणीला खूप आनंद झाला. त्यांनी शंकराची पूजा-प्रार्थना आरंभली. शंकराचा जपही सुरू केला.

काही दिवसांनंतर शंकर त्यांना प्रसन्न झाला. त्याच्या कृपेने राजाला मुलगा झाला. राजाने त्याचे नाव ठेवले, 'लक्षधर'

लक्षधर दिसायला सुरेख होता. गुटगुटीत होता. गोरापान होता. पण विद्याभ्यासात मात्र अगदी 'ढ' होता. नर्मदेतला गोटाच जणू! त्याला लिहिता येईना, की वाचता येईना. राजगुरूंनी त्याला समजावून पाहिले, गोडीगुलाबीने शिकवून बघितले, धाकदपटशा दाखवून, शिक्षा करूनही झाले पण लक्षधराचे लक्ष अभ्यासात काही लागेना.

मग एक दिवस राजा रागावला. 'असला दगड मुलगा राज्याला काय उपयोगाचा?' असा विचार करून त्याने सरळ कोतवालास बोलावून म्हटले,

"त्या मूर्ख मुलाला गावाबाहेर रानात घेऊन जा आणि ठार मारून टाक."

कोतवाल बिचारा काय करणार? तो हुकुमाचा ताबेदार. त्याने राजपुत्राला घेऊन रानाचा रस्ता सुधारला.

राजपुत्राला काहीच पत्ता नव्हता. तो आपल्या आनंदात मग्न होता. रानात गेल्यावर, दिवस मावळला. अंधार पडला. अशा अंधारातच राजपुत्राला मारायला हवे होते. कोतवालाने राजपुत्राला आपल्या पुढ्यात उभे केले आणि डोळे मिटून त्याने आपली तलवार उपसली. आता ती राजपुत्राच्या मानेवर बसणार एवढ्यात चमत्कार झाला. प्रत्यक्ष विद्यादेवी सरस्वती तिथे प्रकट झाली आणि ती कोतवालाला विचारू लागली,

"तू या कोवळ्या मुलाला का मारीत आहेस?"

कोतवालाने उत्तर दिले.

"केवळ राजाने सांगितले म्हणून."

त्यावर सरस्वतीने पुन्हा विचारले.

"राजाने तुला असे का सांगितले?"

कोतवाल म्हणाला,

"मला ठाऊक नाही."

मग सरस्वती म्हणाली,

"आता तू असं कर. तू या मुलाला इथंच सोडून दे. त्याला मारू नको. एखाद्या हिंस्त्र श्वापदाची शिकार कर अन् त्याच्या रक्तात राजपुत्राचे कपडे भिजवून परत जा. राजाला सांग, मी राजपुत्राला ठार मारले आहे. तुमची आज्ञा चोख बजावली आहे."

सरस्वतीच्या या बोलण्यावर कोतवालाला काही बोलताच आले नाही. आधीच तो राजाने दिलेल्या विचित्र आज्ञेमुळे घाबरला होता. तशात हा प्रसंग घडला. त्यामुळे त्याने सरस्वतीला तुम्ही

कोण, वगैरे काही न विचारता तिने सांगितल्याप्रमाणे केले व तो परत गेला.

कोतवालाने आपली आज्ञा तंतोतंत पाळलेली पाहून राजाला बरे वाटले. त्याने कोतवालाला इनाम दिले.

इकडे कोतवाल परत फिरल्यावर राजपुत्र एकटाच जंगलात फिरत राहिला. आपल्याला कोतवाल तलवारीने ठार मारणार होता; परंतु ऐनवेळी एक तेजस्वी मुकुटधारी बाई तिथे आली आणि तिच्यामुळे आपला मृत्यू टळला, एवढेच त्याला समजले. परंतु ही बाई कोण आणि ती एकदम या जंगलात कशी आली, हे काही त्याला समजले नाही. त्यानेही सरस्वतीला तुम्ही कोण? इथे कशा आलात? वगैरे काही विचारले नाही.

राजपुत्राचा मृत्यू टळल्यावर सरस्वती अंतर्धान पावली आणि एका म्हाताऱ्या ब्राह्मण बाईच्या रूपात त्याच्यापुढे प्रकट झाली. ती त्याला विचारू लागली,

"बाळा, तू कोण? कुणाचा मुलगा? तुझं नाव काय? तू इथं कसा काय आलास?"

राजपुत्र अगदी घाबरून गेला होता. जंगलात वाघ-सिंहाच्या आरोऱ्या ऐकू येत होत्या. सर्वत्र अंधार होता. रात्रपाखरे किर्र किर्र करून ओरडून शांततेचा भंग करीत होती. त्यामुळे घाबरलेल्या राजपुत्राला म्हातारीच्या या कनवाळू बोलण्यामुळे धीर आला. त्याने आपली सर्व हकीगत म्हातारीला सांगितली.

मग म्हातारी त्याला म्हणाली,

"ठीक आहे. बाळा, तू आता भिऊ नको. मी या जंगलातच राहते. तूही माझ्या झोपडीत राहा."

राजपुत्राने "बरे" म्हटले, तो त्या जंगलातच म्हातारीबरोबर राहू लागला.

एकदा म्हातारी बाहेर गेली होती. राजपुत्र लक्षधर एकटाच झोपडीत होता. त्याला करमेनासे झाले. मग तो वेळ घालवण्यासाठी काही वस्तू जवळपास मिळते का ते पाहू लागला. शोधता शोधता त्याला एक पुस्तक सापडले. त्याच्यावर राधा-कृष्णाचे सुंदर चित्र

होते. लक्षधराने ते पुस्तक उघडले पण त्याला काही वाचता येईना. त्यामुळे त्याला राग आला आणि रागाच्या भरात त्याने ते पुस्तक उचलले नि नदीत भिरकावून दिले. पुस्तक पाण्यात भिजले, त्याच्यावरची अक्षरे धुवून गेली आणि त्याचे कागद सुटे सुटे होऊन पाण्याच्या तळाशी गेले.

म्हातारी झोपडीत परत आली तेव्हा तिला आपले मूल्यवान पुस्तक लक्षधराने नदीत फेकून दिल्याचे कळले. पुस्तकाचा विध्वंस झाल्याचे पाहून तिला जसे वाईट वाटले, तसाच लक्षधराचा संतापही आला. मग ती त्याच्यासमोर सरस्वतीच्या मूळ रूपात प्रकट झाली आणि रागाने म्हणू लागली,

''मूर्ख मुला, काय केलंस हे? माझं अत्यंत मूल्यवान पुस्तक नष्ट भ्रष्ट करून काय मिळवलंस? अरे, ते पुस्तक म्हणजे सगळ्या जगाला विद्यादान करण्याचं मोठं साधन होतं, तू मठ्ठ आहेस, ढ आहेस हे मला ठाऊक होतं पण तू एवढा मूर्ख असशील असं नव्हतं मला वाटलं. खरं तर तुला चांगला शाप द्यायला हवा; पण तुझा भाबडा चेहरा पाहिला की मला तुझी कीव येते...''

असं म्हणून सरस्वती बोलायची थांबली. लक्षधराला आता आपली चूक कळून आली. तो लगबगीने खाली वाकला आणि सरस्वतीचे पाय घट्ट धरून म्हणाला,

''देवी, मी चुकलो. पुन्हा असं करणार नाही. आत्ताच्या आत्ता मी जातो नि ते पुस्तक नदीतून काढून आणतो.''

असे म्हणून लक्षधर उठून नदीकडे धावणार तोच देवीने त्याला वर उचलून धरले आणि अत्यंत मायाळूपणे ती त्याला म्हणाली,

''हे बघ, तुझी चूक तुला समजली ना? पुस्तक परत कसं मिळवायचं ते मी पाहीन. तू आता असं कर; इथून जवळच विद्यानगर नावाचं राज्य आहे. त्या राज्यात वेदवती नामक राजकन्या राहते. तिला एक नोकर हवा आहे. तू तिचा नोकर हो आणि तिच्या गुरूजवळ विद्या शीक. ते तुला शिकवतील अन् तूही

त्यांच्या प्रभुत्वाखाली हुशार होशील. जा, उशीर करू नको.''

देवीचे म्हणणे लक्षधराने लक्षपूर्वक ऐकले. त्याने मग उशीर केला नाही. लगोलग तो विद्यानगरास पोचला आणि धूला कुट्ट्या हे नवे नाव घेऊन वेदवतीच्या सेवेत रूजू झाला. त्याचवेळी त्याने तिचे गुरू पंडित जनार्दन मिश्र यांना आपल्याला विद्या शिकवण्याची विनंती केली. राजकन्या वेदवतीनेही त्यांच्याकडे धूला कुट्ट्याची भलावण केली. मग पंडित जनार्दन मिश्रांनी धूला कुट्ट्याला शिकवण्याचे मान्य केले.

अशी चार वर्षे गेली.

धूला कुट्ट्या आता चांगला शहाणा झाला, ज्ञानी झाला. एवढ्यात सरस्वतीपूजनाचा सण आला. धूलाने रात्रभर जागून सरस्वतीपूजनाची सारी सिद्धता केली; पण पहाट होता होता त्याला झोपेने घेरले. त्याने बळे बळे जागे राहण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ! अखेर त्याला डुलकी लागलीच. जागा झाला तेव्हा त्याने पाहिले, एक म्हातारी ब्राह्मण बाई सारे पूजासाहित्य भराभरा आपल्या ओटीत भरून पळण्याच्या प्रयत्नात होती. धूला कुट्ट्याला मोठे आश्चर्य वाटले. काहीसा रागही आला. तो झटकन् उठला आणि म्हातारीचे मनगट पकडून ओरडला,

''ए म्हातारे, कुठं चालवल्यास माझ्या सर्व पूजावस्तू? चोरटे, थांब तुला कोतवालाच्याच ताब्यात देतो.''

त्याबरोबर ती म्हातारी घाबरली आणि काकुळतीला येऊन गयावया करू लागली. ती म्हणाली,

''लेकरा, मला का चोरटी ठरवतोस? ही सगळी पूजा तर तू माझ्यासाठीच मांडलीस ना?''

''चल चल, म्हणे माझ्यासाठीच पूजा मांडलीस ना? वा गं वा! बरीच भामटी आहेस! ही पूजा मी सरस्वतीदेवीसाठी मांडलीय! तिच्याच कृपेनं मी शहाणा अन् बुद्धीमान झालो नं? तू काय देवी सरस्वती आहेस का?''

म्हातारी म्हणाली.

''तू असं का करीत नाहीस घटकाभर मलाच सरस्वती

का समजत नाहीस? माझीच पूजा का करीत नाहीस?''

''अग पण तू देवी नसताना तुझी पूजा मी कशी करू?'' धूला कुट्ट्या चिडून विचारू लागला.

त्यावर म्हातारी हसली नि म्हणाली.

''बाळा, मीच तुझी ती देवी सरस्वती. तू कितीसा शहाणा झालास, ते पाहण्यासाठीच मी हे रूप घेतलं. आता पाहा बरं''

असे म्हणून देवीने आपले मूळ रूप धारण केले.

आपल्यासमोर आता म्हातारी नाही; प्रत्यक्ष देवी सरस्वतीच उभी आहे, हे पाहून धूला कुट्ट्याला मोठे आश्चर्य वाटले, आनंदही झाला. तो देवीपुढे वाकून नमस्कार करीत म्हणाला,

''देवी, मला क्षमा कर. मी तुला ओळखले नाही. माझ्याकडून तुझा अपमान झाला.''

देवीने धूला कुट्ट्याला जवळ घेतले, कुरवाळले आणि ती त्याला म्हणाली,

''मी तुला क्षमा केली आहे.''

एवढं बोलून देवी अंतर्धान पावली. धूला कुट्ट्या आपले गुरू जनार्दन मिश्र यांना ही नवलाची गोष्ट सांगावी म्हणून त्यांच्या महालाकडे वळला. पण जनार्दन मिश्र त्यांच्या महालात नव्हते. ते होते राजकन्येच्या महालात. मग धूला कुट्ट्या राजकन्येच्या महालात आला. पाहतो तर काय, सगळाच प्रकार विपरीत अन् चमत्कारीक!

राजकन्या एक पुस्तक वाचीत रत्नखचित मंचकावर बसली आहे नि तिच्या पायांशी गुरूजी जनार्दन मिश्र लाचार होऊन बसले आहेत. ते म्हणत आहेत,

''हे बघ वेदवती, मला तू खूप आवडतेस. माझं तुझ्यावर प्रेम बसलं आहे. तू माझ्याशी लग्न करशील का?''

जनार्दन मिश्रांचे हे बोलणे धूला कुट्ट्याने ऐकले मात्र, त्याचा संताप अनावर झाला. आपले गुरू असे काही घाणेरडे वागतील असे त्याला कधीही वाटले नव्हते; परंतु आता तो ते प्रत्यक्षच पाहत होता. त्याला वाटले, आता निदान राजकन्या तरी त्यांना

काहीतरी खरमरीत उत्तर देईल.

पण तसे काही घडले नाही. उलट राजकन्येने मान तिरपी करून त्यांना प्रश्न केला तो असा -

''पण हे कसं शक्य आहे? महाराज आपल्या लग्नाला कधीतरी संमती देतील का? लग्न करायचं म्हणजे आपल्याला इथून पळून जावं लागेल! तुम्हाला ते जमेल का?''

''का नाही? सहज जमेल. उद्या रात्रीच आपण इथून पसार होऊ. मात्र तोपर्यंत तू काळजी घे. कुणालाही यातलं काहीही कळता उपयोगाचं नाही. समजलं? ठरलं तर मग! उद्या रात्री....''

पंडित जनार्दन मिश्र फारच उतावळेपणानं बोलत होते. दरवाजाच्या आडोशाला उभे राहून हा सर्व प्रकार पाहणाऱ्या धूला कुट्ट्याला आता मात्र शांत राहवेना; परंतु त्याने आपला राग कसाबसा आवरला आणि तिथून तो माघारी फिरला. राजवाड्याचा एक चौक ओलांडून तो मोकळ्या मैदानात आला, तेव्हा त्याला बरे वाटले. काय करावे, कसे करावे, असा विचार करीत असता, त्याला एकदम दूरच्या कोपऱ्यात काठी टेकत जाणारी म्हातारी दिसली. धूला कुट्ट्याने बरोबर ओळखले, नक्कीच ही सरस्वती असणार!

तो लगबगीने तिच्याकडे धावला. त्याने घडलेला सगळा प्रकार म्हातारीला सांगितला. त्यावर म्हातारी म्हणाली,

''तू काही काळजी करू नको. सगळं काही ठाकठीक होईल. राजकन्या पळून जात नाही. जनार्दन मिश्र तर घरातून बाहेरच पडत नाहीत. तू मात्र एक कर, उद्या रात्री नदीवर होडी घेऊन तयार राहा. बारा वाजून गेले की मी तिथं येईन नि होडीत बसेन. मी होडीत बसले की तू होडी भरधाव वल्हव. पुढचं पुढं.''

धूला कुट्ट्याने सगळे कबूल केले. राजकन्या पळून जात नाही, हे ऐकून त्याला एवढा आनंद झाला की त्या भरात म्हातारीने आपल्याला नदीवर कशाला बोलवले आहे, हे त्याला कळलेच

नाही.

दुसऱ्या दिवशी जनार्दन मिश्र राजकन्येबरोबर पळून जाण्यासाठी घराचा उंबरा ओलांडू लागले तोच घराचे जीर्ण मोडके छत एकदम त्याच्या अंगावर कोसळले आणि त्यांच्या डोक्याला जबर मार बसला. त्यांचे पाय तर मोडलेच; हाताची हाडेही चांगलीच पिचली.

इकडे राजकन्या तिन्हीसांजेस नदीकिनारी एका अंधाऱ्या देवळात जाऊन बसली होती. जनार्दन मिश्र तिथे आले की रात्रीच्या अंधारात होडीत बसून ते पळून जाणार होते. पण रात्रीचे दहा वाजले, अकरा वाजले नि बारा वाजायला आले तरी जनार्दन मिश्रांचा पत्ता नाही. मग राजकन्या घाबरली. तिला आता घरीही जाता येईना. ती रडू लागली. तिचे रडणे ऐकून देवी सरस्वती म्हातारीच्या रुपात तिथे आली आणि राजकन्येला मोठ्या मायाळूपणे विचारू लागली,

''बाळ, तू कुणाची कोण? अपरात्री या देवळात तू कशी आलीस आणि अशी रडतेस कशासाठी?''

एक म्हातारी बाई आपल्याला अत्यंत ममतेने विचारते आहे असे पाहिल्यावर राजकन्येने सगळे काही खरेपणाने सांगून टाकले. राजकन्येची हकिगत ऐकल्यावर म्हातारी म्हणाली,

''मुली, झालं ते बरंच झालं. नाही तरी गुरू-शिष्येनं लग्न करणं अन तेही असं पळून जाऊन, लपून-छपून करणं वाईटच. देवानंच तुला तारलं म्हणायचं.''

''आजीबाई, तुम्ही म्हणता ते सगळं खरं! पण मी आता काय करू? घरी तरी कशी परत जाऊ?'' राजकन्या काकुळतीला आली.

देवीला तिची दया आली. ती म्हणाली,

''एवढंच ना? मी तुला मार्ग सांगते. एवीतेवी घर सोडलयसच ना तू? तर मग आता असं कर. माझी ही काठी घे. म्हातारीचं सोंग घे. अशीच नदीवर जा. एक नावाडी होडी घेऊन तिथं उभा आहे. त्याच्या होडीत बैस. बोलू नकोस. तो तुला पैलतिरी घेऊन जाईल. पुढचं पुढं. जा, माझ्यावर विश्वास ठेव.''

राजकन्येने बरे म्हटले आणि ती म्हातारीचे सोंग घेऊन नदीवर गेली. धूला कुट्ट्या तयार होताच. त्याने विचारले,

''आलीस का म्हातारे ?''

म्हातारीने मान डोलावली.

मग धूला कुट्ट्याने एक हात पुढे करून तिला होडीत घेतले. राजकन्या होडीत बसताना तिचा हात धूला कुट्ट्याला भारीच मऊसूत अन नाजूक वाटला. त्याला फार आश्चर्य वाटले. म्हातारीचा हात एवढा नाजूक कसा? पण मग त्याच्या लक्षात आले; तो मनाशी म्हणाला,

'म्हातारी म्हणजे देवी सरस्वती नव्हे का? तिचा हात नाजूक असणारच!'

एवढ्यात वारा सुटला. धूला कुट्ट्याने होडी भरधाव सोडली. तासाभरात तो नदीच्या पैलतिरी पोचला. उत्तररात्र होती. थंडगार वारे अंगाला झोंबत होते. आकाशात चार-दोन चांदण्या डोळे मिचकावीत चमचमत होत्या. बाकी काळोख होता. नदीच्या पैलतीरी एक छानसे, सुंदर उपवन होते. धूला कुट्ट्या या सगळ्या आनंददायक वातावरणामुळे चांगलाच खुषीत होता. एक शीळ घालीत त्याने जमिनीवर उडी मारली. मागे वळून, एक हात पुढे करून तो म्हणाला,

''हं म्हातारे, चल उतर आता!''

पण काय आश्चर्य! म्हातारी तिथं होतीच कुठे? होडीत होती राजकन्या. घाबरले, बावरलेली, थरथर कापणारी अन् मुसमुसून रडणारी. धूला कुट्ट्या तिला पाहून चकितच झाला. एवढ्यात राजकन्या वेदवती होडीतून उतरली आणि धूला कुट्ट्याला मिठी मारून म्हणाली,

''धूला, मला माफ कर. मी चुकले. करू नये तो अविचार मी केला. पण आता तूच माझा सखा आहेस. सर्वस्व आहेस.''

धूलाला काय करावे, काय बोलावे ते समजेना. तो गांगरला. चाचरत म्हणाला,

''पण तुम्ही असं काय बोलता? मी तुमचा दास नव्हे

काय? दासाचं राजकुमारीशी लग्न झाल्याचं कधी ऐकलंय कुणी?''

''धूला, पुरे. नको बोलूस आणखी. का लाजवतोस मला? तू माझा दास असशीलही कधी काळी; पण आता मात्र मी तुझी दासी आहे. मला पदरात घे. माझ्याशी लग्न कर.''

-असं म्हणून राजकन्या रडू लागली. रडता रडताच तिने धूला कुट्ट्याला सगळी हकिगत सांगितली. धूलाला तिची दया आली, परंतु त्याचा निश्चय होईना.

एवढ्यात सरस्वती तिथे प्रकटली आणि तिने अधिकार वाणीने धूला कुट्ट्याला म्हटले,

''धूला, तू वेदवतीशी लग्न कर.''

मग धूलाचे वेदवतीशी लग्न लागले. सरस्वतीच्या कृपेनेच त्याला राज्यही प्राप्त झाले आणि दोघे सुखाने राहू लागले.

❖ ❖

# ४.

# वाघ आणि माणूस

खूप खूप जुन्या काळची गोष्ट आहे. वाघ आणि माणूस तेव्हा एकमेकांचे जिवलग मित्र हाते. दोघे शेजारी राहत. दोघांच्या झोपड्या होत्या आणि शेतीवाडीसुद्धा होती. दिवसभर शेतात कष्ट करावे, घाम येईतो खपावे अन् रात्री विश्रांतीला झोपडीत परतावे; भाकरीचा तुकडा खाल्ला, पाण्याचा घोट घेतला की अंगणात येऊन शिळोप्याच्या गोष्टी बोलत बसावे. असा त्यांचा दिनक्रम वर्षानुवर्षे चालू होता.

पण एकदा काय झाले, एक रानडुक्कर त्यांच्या शेतात घुसला. एका रात्री माणसाच्या शेतात तर दुसऱ्या रात्री वाघाच्या शेतात घुसून तो धान्याची नासाडी करी. वाघ आणि माणूस दोघेही त्याच्या या उपद्रवाला कंटाळले. त्यांनी रानडुकराचा बंदोबस्त करायचा विचार केला. वाघ माणसाला म्हणाला,

"हे बघ, हा रानडुक्कर खूप शक्तीवान आहे. शिवाय, तो तुझ्या-माझ्या शेतातलं फुकटचं धान्य खाऊन फार माजलाय! तेव्हा तो तुला एकट्याला काही आटपायचा नाही. म्हणून आपण दोघे मिळून त्याला मारू."

माणूस म्हणाला, "बरं आहे. मी प्रथम त्याला भाला फेकून मारतो. तेवढ्यानं तो मेला तर ठीकच; नाही मेला तर तू त्याच्यावर झेप घेऊन त्याला आवळून धर. मग त्याच्या डोक्यात भाला घालतो."

वाघ म्हणाला, ''तू म्हणतोस ते बरोबर आहे पण गडबडीत डुक्कर निसटून जाईल अन् तुझा भाला माझ्याच डोक्यात बसेल!''

त्यावर माणूस घाईघाईने बोलला, ''छे! छे! असं कसं होईल? तू माझा जिवलग मित्र आहेस. मी तुझ्या डोक्यात भाला कसा घालीन? तू रानडुक्कर मात्र सोडू नकोस.''

वाघ ''बरं आहे'' असे म्हणाला. त्या रात्रीच रानडुक्कर माणसाच्या शेतात घुसला आणि नाकावरच्या शिंगाने जमीन उकरू लागला. माणूस सावध होताच. त्याने एक-दोनदा आवाज कुठून येतो याचा कानोसा घेतला. मग तो लांब जाऊन उभा राहिला आणि तिथून त्याला बरोबर नेम धरून रानडुकरावर भाला फेकला. भाला जो आला, तो नेमका डुकराच्या पोटात घुसला. त्याबरोबर डुकराने एक कर्णकर्कश किंकाळी फोडली व तो जमिनीवर उताणा पडून पाय झाडू लागला.

डुक्कर पडलेला पाहताच वाघाने त्याच्यावर झेप घेतली. तेवढ्यात डुक्कर मेला. वाघाने डुकराच्या अंगावर झेप घेतलेली माणसाने पाहिली होती व त्याच वेळी डुक्कर मरून पडल्याचेही त्याने बघितले होते. त्यामुळे तो धावत धावत डुक्कर मरून पडले होते, तिथे आला.

वाघाचे डोळे अंधारात ठिणग्यांसारखे चमकत होते, आणि तो घशातल्या घशात घुरघुर करीत होता. त्याचा तो अवतार पाहताच माणूस थोडा घाबरला. त्याने ओळखले की वाघोबांना डुकराचे मांस खाण्याचा मोह झालेला आहे. परंतु आपण भाला अचूकपणे फेकल्यामुळेच डुक्कर मेला आहे, हेही त्याला ठाऊक होते. त्यामुळे एकट्या वाघाला सगळाच्या सगळा डुक्कर खाऊ द्यायचा नाही, असे त्याने मनोमन ठरवले पण वाघाची स्वारी तर रागीट दिसत होती. आता काय करावे बरे? मग माणूस त्याला गोडीगुलाबीने म्हणाला,

''वाघोबा, तुम्ही अगदी छान टिपण साधलेत हां! तुम्ही उडी घ्यायला अन् डुक्कर मरायला एकच गाठ पडली.

आपल्याविषयीच्या कौतुकाचे हे उद्गार ऐकताच वाघोबा फुशारले.

ते पोटातील गुरगुर ओठात आणून म्हणाले,

''कसं बोललास? मी म्हटलं नाही, तुला एकट्याला डुक्कर मारता येणार नाही म्हणून!''

''होय की! मी तरी तेच म्हणतो, मी भाला फेकला, तो डुकराच्या पोटात घुसला अन् मग तुम्ही उडी घेताच डुकराने डोळे मिटले. तो मरून पडला. आपण दोघांनी मिळून हा डुक्कर मारला हेच खरं!''

वाघाला माणसाचे हे बोलणे आवडले नाही. त्याने मिशा फिस्कारल्या, डोळे वटारले. दात विचकले आणि एक भयानक डरकाळी फोडून तो माणसाला म्हणाला,

''हे बघ, आपण दोघांनी जरी हा डुक्कर मारला असला तरी त्याचं मांस मी एकटाच खाणार!''

''का म्हणून? तुझ्या एवढाच माझाही या डुकरावर हक्क आहे. मांस खायचेच तर दोघांनी निम्मे निम्मे वाटून घेऊन खाल्ले पाहिजे. शिवाय, असं पाहा, हा डुक्कर आपल्या दोघांच्याही शेतातलं धान्य आळीपाळीने फस्त करीत होता. त्यामुळेही तो आपल्या दोघांच्या मालकीचा ठरतो.''

माणसाचा हा युक्तीवाद वाघाला पटला. तो माणसाला म्हणाला,

''ठीक आहे. तुझं म्हणणं मला मान्य. आता मी हा डुक्कर तुझ्या स्वाधीन करतो. तू तो तोड, चीर, शिजव आणि मग त्याचं मांस आपण दोघे वाटून घेऊन खाऊ. मी जरा नदीवर जाऊन आंघोळ करून येतो.''

माणूस म्हणाला, ''फारच छान! तू जरूर आंघोळीला जा. मी मांस शिजवून ठेवतो. तू आलास की आपण ते खाऊ.''

मग वाघ आंघोळीला गेला.

माणसाला फार नवल वाटले. सगळा डुक्कर मी एकटाच खाणार! असा हट्ट घेणारा हा वाघ एकाएकी असा मऊ अन् समजूतदार का बनला असावा, हे त्याला कळेना. तो विचार करू लागला, याच्या मनात काही कपट तर आलं नाही ना? की हा नदीवर जातो असं म्हणून जवळपास लपून बसला असेल?

माणसाने थोडा शोध घेतला; पण वाघ कुठे लपल्याचे दिसेना. मग माणूस झाडावर उंच चढला आणि तिथून नदीकडे पाहू लागला. तो काय, वाघोबा खरोखरच नदीत उतरून आंघोळ करीत होते. ते पाहिल्यावर माणूस घाईघाईने खाली उतरला. त्याने तो डुक्कर धारदार कोयत्याने चिरला आणि शिजवला. डुक्कर शिजू लागला तसा त्याच्या मांसान्नाचा घमघमाट साऱ्या रानभर दरवळला. वाघोबांनी डुकराचा वास नाकाशी भिडताच आंघोळ संपवली नि घराकडे पावले वळवली.

एवढ्यात माणसाला वाटले, ''वाघोबाला आज प्रथमच मांस खायला मिळणार! न जाणो, त्यांना हे मांस रुचकर लागले तर! तर उद्या ते आपल्याही मांसाची चटणी करायला मागेपुढे पाहणार नाहीत. त्यापेक्षा आपण असं केलं तर? डुकराचं मांस आपण खावं नि वाघोबांच्या पुढ्यात ठेवावं, झाडाच्या कोवळ्या, लुशलुशीत साली, बारीक खोडांचे तुकडे, मोहाची फुलं असं सगळं शिजवून. पाहायचं जमलं तर एक कपट करून!''

- आणि खरोखरीच माणसानं वाघोबा येण्यापूर्वी निम्म्याहून अधिक डुक्कर खाऊन संपवले आणि तो पालापाचोळा झाडाची सालं शिजवून वाघ येण्याची वाट पाहत बसला.

तेवढ्यात वाघोबा आलेच. माणसाने त्यांच्यापुढे झाड - पाल्याचा रस्सा ठेवला आणि आपल्या पानात डुकराचे मांस वाढून घेतले. दोन्ही पदार्थांचा रंग अगदी एकसारखा होता. वासही पुष्कळसा सारखाच होता. त्यामुळे वाघोबांना आधी काही कळले नाही. तशात त्यांना भूकही सपाटून लागली होती. ते आले आणि पान पुढ्यात घेऊन रस्सा ओरपू लागले. थोड्याच वेळात माणसाचे कपट त्यांच्या लक्षात आले. माणूस सावधपणे मांस खात होता. एवढ्यात वाघाने त्याच्या पानातल्या मांसावर झेप घेतली. त्याबरोबर माणूस घाबरून तिथून जो पळाला तो आजपर्यंत पुन्हा जंगलात म्हणून गेला नाही. वाघ मात्र सारे जंगल आपल्या आरोळ्यांनी दणाणून सोडत आणि माणसाचा वास घेत हिंडतो आहे!

३०२६ ॥ ५२ ॥ लाख मोलाचा
दि. १२।१२।८७
BVBK-0403026

## खास मुलांसाठी...

- छोटू (बालकथा) / यदुनाथ थत्ते / रु. ८/-
- अवकाशात मानवाची मुसंडी / यदुनाथ थत्ते / रु. ८/-
- विनोबांच्या गोष्टी - भाग १ ते ३ /
  राजा मंगळवेढेकर / रु. २१/-
- कां व कसे? / सुनील अंबिके / रु. २५/-
- हसा! मुलांनो हसा! / सुनील अंबिके / रु. १८/-
- कथाभारती / डॉ. वसंत डोळस / रु. १८/-
- लाख मोलाचा रत्नहार / मो. मा. वाळिंबे / रु. १८/-
- बहादूर बेटा / मो. मा. वाळिंबे / रु. १८/-

श्री समर्थ साई वितरण, पुणे